MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
दिशा

वर्ष सव्वीसावे / अंक ८ / ऑगस्ट २०२५

# संपादकीय

## राष्ट्रीय अंतराळ दिवस

दरवर्षी २३ ऑगस्ट हा दिवस आपल्या देशात 'राष्ट्रीय अंतराळ दिवस' म्हणून साजरा करण्यात येतो. २३ ऑगस्ट २०२३ रोजी भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने एक अतिशय मोलाचे काम करून दाखविले. त्या दिवशी भारताचे यान चंद्राच्या दक्षिण धृवावर सुखरूप उतरले. चंद्रयान मोहिमेचा हा तिसरा प्रयत्न होता. पहिला प्रयत्न २२ ऑक्टोबर २००८ मध्ये करण्यात आला. त्यावेळी चंद्रापर्यंत यान पोहोचविण्यात आपण यशस्वी ठरलो. या यानाने चंद्राच्या पृष्ठभागाचे फोटो पाठवले. एवढेच नव्हे तर, चंद्राच्या पृष्ठभागावर पाणी असल्याचा संकेत दिला. २९ ऑगस्ट २००९ रोजी या यानाशी संपर्क तुटला. त्यानंतर १० वर्षांनी चंद्रयान २ ही मोहीम राबविण्यात आली. २२ जुलै २०१९ रोजी एक लँडर आणि एक रोवर सह यानाचे उड्डाण करण्यात आले. हे यान चंद्रावर पोहोचले, पण विक्रम लँडर ठरल्याप्रमाणे चंद्राच्या पृष्ठभागावर उतरू शकला नाही. या अपयशाने निराश न होता, उलट अपयशातून धडा घेऊन तिसरा प्रयत्न २०२३ मध्ये करण्यात आला. २४ जुलै २०२३ रोजी प्रक्षेपित केलेले ज्ञान २३ ऑगस्टला सुखरूप पोहोचले. त्यातील विक्रम लँडर आणि प्रज्ञान रोवर देखील विना अडथळा चंद्राच्या पृष्ठभागावर योग्य ठिकाणी उतरले. या यशामुळे चंद्रावर यान पाठविण्याऱ्या मोजक्या देशांत भारताची गणना होऊ लागली. हे यश साजरे करण्यासाठी २०२४ पासून २३ ऑगस्टला हा दिवस राष्ट्रीय स्तरावर अंतराळ दिवस म्हणून साजरा करण्याचे ठरविण्यात आले. २०२५ च्या २३ ऑगस्टला दुसरा अंतराळ दिवस साजरा करण्यात येत आहे.

१९५७ मध्ये रशियाने स्पुटनिक उपग्रह अंतराळात पाठवून अंतरिक्ष संशोधनाला सुरुवात केली. त्यानंतर चारच वर्षांनी भारतात अंतरिक्ष संशोधनाची मुहूर्तमेढ रोवली गेली. अणूऊर्जा आयोगाच्या आधिपत्याखाली १९६१ मध्ये 'अंतरिक्ष संशोधन विभाग' स्थापना करण्यात आला. १९६९ मध्ये भारतीय अंतराळ संशोधन संघटनेची (Indian Space Research Organisation) स्थापना झाली. या संस्थेचा संक्षिप्त रूपात 'इस्रो' असा उल्लेख करतात. सुरुवातीला डॉ. विक्रम साराभाई यांनी या संघटनेला दिशा दिली. त्यांच्या मृत्यूनंतर आलेल्या अंतराळ आयोगाच्या अध्यक्षांनी साराभाई यांची परंपरा कायम ठेवली. आज भारताने अंतरिक्ष संशोधनात मानाचे स्थान मिळविले आहे. मागील महिन्यात अमेरिकेच्या 'नासा' या प्रतिथयश संस्थेच्या सहकार्याने निसार हा उपग्रह इस्रोने यशस्वीपणे अवकाशात प्रस्थापित केला. भारतीय अंतराळ संशोधन संघटनेची वाटचाल खरोखरच कौतुकास्पद आहे.

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

उपग्रह प्रक्षेपणाची सुरुवात १९७० च्या दशकात झाली. १९७५ मध्ये रशियन अग्निबाणाच्या मदतीने आर्यभट्ट नावाचा उपग्रह अवकाशात सोडण्यात आला. त्यानंतर चार वर्षांनी पुन्हा एकदा रशियन अग्निबाणाच्या मदतीने आणखी एक उपग्रह अंतराळात पाठविण्यात आला. १२ व्या शतकातील प्रसिद्ध गणिती भास्कराचार्य यांच्या स्मरणार्थ त्या उपग्रहाचे नाव 'भास्कर' असे ठेवण्यात आले होते. मधल्या काळात अग्निबाण विकासाचे कार्य भारतात सुरूच होते. इस्रोने १९८० मध्ये स्वतःचे एसएलव्ही नावाचे अग्निबाण विकसित केले. त्याचा उपयोग करून रोहिणी नावाचा उपग्रह अंतराळात पाठविण्यात इस्रोला यश आले. त्यानंतर अधिक क्षमतेचे अग्निबाण बनविण्याचे प्रयत्न सुरू झाले. या प्रयत्नात यश आल्याने भूस्थिर कक्षेत उपग्रह प्रस्थापित करण्याचे धाडस इस्रो या संघटनेने केले. भूस्थिर कक्षेत फिरणाऱ्या इन्सॅट नावाच्या या उपग्रहाने क्रांतीच केली. हा उपग्रह सतत आपल्या देशावर राहतो. दूरसंचार (Telecommunication), दूरसंवेदन (Remote sensing) आणि हवामानाचा अंदाज (Weather forecasting) अशी तीन कामे हा उपग्रह करतो. त्यामुळे भारताच्या आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीला वेग आला. भूस्थिर कक्षेतील उपग्रहांच्या यशानंतर इस्रोने आपले लक्ष ध्रुवीय कक्षेतील उपग्रहांकडे वळविले. अल्पावधीतच यात देखील यश मिळाले. हा उपग्रह ध्रुवीय कक्षेत फिरत असल्याने वेगवेगळ्या देशांवरून जात असतो. हे देश या उपग्रहांच्या उपयोग करून त्याचे भाडे इस्रोला देतात. यातून आपल्या देशाला परकीय चलनात चांगले उत्पन्न मिळते.

२१ व्या शतकात भारतीय अंतरिक्षसंशोधन संस्थेने आपले लक्ष्य चंद्रावर केंद्रित केले. आपल्या देशातील अनेक सणवार चंद्राच्या गतीवर अवलंबून आहेत. असे जरी असले तरी चंद्राचा आपण पद्धतशीर अभ्यास केलेला नाही. ते साध्य करण्यासाठी चंद्रावर यान पाठवण्याची योजना आखण्यात आली. वर सांगितल्याप्रमाणे तिसऱ्या प्रयत्नात २०२३ मध्ये हे स्वप्न पूर्ण झाले. सूर्य हा आपल्या पृथ्वीला ऊर्जा देतो. त्याच्याबद्दल शास्त्रज्ञांमध्ये मोठे कुतूहल आढळते. आधी जमिनीवरून दुर्बीणीच्या मदतीने सूर्याची माहिती मिळविण्याचा प्रयत्न झाला. अलीकडच्या काळात अंतरिक्षात दुर्बीण पाठवून सूर्याचा अभ्यास करण्यात येत आहे. या क्षेत्रात देखील भारताने पाऊल टाकायचे ठरवले. सूर्याचा जवळून अभ्यास करण्यासाठी आपल्या देशाने 'आदित्य' नावाचे यान पाठविले आहे. हे यान पृथ्वीपासून सुमारे १५ लाख किलोमीटर अंतरावर राहून सूर्यासंबंधी निरीक्षणे पाठवित असते. यातून सूर्याची जडणघडण, ऊर्जा निर्मिती, सूर्यावरील वादळे अशा अनेक बाबींची सखोल माहिती आपल्याला मिळत राहते. 'आदित्य यान मोहीम' ही इस्रोची अतीशय महत्त्वाची मोहीम आहे. आता तर इस्रो गगनयानाची तयारी करीत आहे. ही मोहीम यशस्वी झाली की आपले अंतराळवीर अंतरिक्षात मुक्काम करू शकतील. ते दिवस फार दूर नाहीत.

अल्पावधीत भारतीय शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञांनी अंतरिक्ष क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. या क्षेत्रात झालेल्या प्रगतीची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. विशेषत: शाळा आणि महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधनाचा परिचय करून देणे फारच महत्त्वाचे आहे. त्यासाठी शैक्षणिक आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्र येऊन प्रयत्न करण्याची गरज आहे. राष्ट्रीय अंतराळ दिवसाचे औचित्य साधून विविध स्तरांवर असे प्रयत्न होतील अशी आशा बाळगू या.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●

# व्ही.पी.एम्. दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना ● नौपाडा ठाणे ● १९३५

**वर्ष सव्वीसावे/अंक ८/ऑगस्ट २०२५**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ३० वे/अंक २ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | लोकमान्य टिळक पुण्यतिथीच्या निमित्ताने... | डॉ. अपर्णा लळिंगकर | २ |
| ३) | देउनिया अपुरेपण रक्षिसी मला पुरेसा.. | प्रमोद वसंत बापट | ६ |
| ४) | स्त्री चित्रकार | श्री. चन्द्रशेखर टिळक | ९ |
| ५) | उंटांची अद्भूत रम्य दुनिया २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष | सौ. अल्पना बापट | १४ |
| ६) | परिसर वार्ता | संकलित | २५ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# लोकमान्य टिळक पुण्यतिथीच्या निमित्ताने...

*लोकमान्य टिळक व स्वामी विवेकानंदांच्या हृदयंगम संबंधावर डॉ अपर्णा लाळिंगकर यांचा लेख : संपादक*



१ ऑगस्ट ही लोकमान्यांची पुण्यतिथी. शाळेत असताना नेहमी १ ऑगस्टला लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथी निमित्त भाषण करण्याच्या चमूत मी असे. मग ते वर्गात गोष्ट सांगणे असो किंवा लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त लोकमान्यांच्या कथाकथन स्पर्धांमधील सहभाग असो. त्यावेळची सगळ्यात आवडती गोष्ट म्हणजे, 'मी शेंगा खाल्ल्या नाहीत तर मी टरफले उचलणार नाही' हा त्यांचा बाणेदारपणा की जो त्यांच्या इंग्रजांविरुद्धच्या राजकीय कारकिर्दीतही दिसून येतो. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' असे गर्जना करून न्यायालयात सांगणाऱ्या टिळकांना इंग्रज घाबरत असत.

टिळकांनी डेक्कन कॉलेज मधून गणितात बी.ए. ची पदवी पहिल्या वर्गात संपादीत केलेली होती. पुढे गणितात एम.ए. करत असतानाच त्यावेळची सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी एम.ए. गणित हे शिक्षण सोडून लॉ कॉलेजमध्ये कायद्याच्या पदवीचे शिक्षण घेण्यास सुरुवात केली. त्याच दरम्यान विष्णूशास्त्री चिपळूणकर हे एका सरकारी शाळेत शिक्षक होते. निबंधमालाकार विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी सरकारी नोकरी सोडून शाळा काढण्याचे ठरविले होते तेव्हा टिळक व आगरकर दोघेही त्यांना भेटले. १ जानेवारी १८८० रोजी न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना झाली. टिळकांनी विनावेतन शिक्षकी पेशा पत्करला. विष्णूशास्त्री १८८२ मध्ये मरण पावले तथापि १८८४ मध्ये वेडरबर्न, वड्स्वर्थ, मंडलिक, तेलंग, दांडेकर, य.मो. केळकर, भांडारकर वगैरे प्रभृतींच्या मदतीने टिळक-आगरकरांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली आणि या संस्थेतर्फे १८८५ मध्ये फर्ग्युसन महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. येथे टिळक गणित व संस्कृत विषय शिकवीत.

लोकमान्य टिळक हे जहाल मताचे समाजसुधारक होते. त्यामुळे त्यांचे गोपाळकृष्ण गोखले आणि गोपाळ गणेश आगरकर या दोन समकालिन आणि मित्र समाजसुधारकांबरोबर मतभेद असत. गोखल्यांबरोबरच्या मतभेदांमुळेच टिळकांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीतून बाहेर पडून 'शिक्षण प्रसारक मंडळी' या शिक्षण संस्थेची स्थापना केली. या दोनही शिक्षण संस्था आणि डेक्कन कॉलेज हे पुण्यातील प्रसिद्ध शिक्षण संस्थांमधील आहेत. लोकमान्य टिळक हे त्यामुळे क्रांतिकारकांना पाठिंबा देत असत. पुण्यातील रँडच्या खुनात हुतात्मा झालेल्या चाफेकर बंधुंना लोकमान्य टिळकांनी पाठिंबा दिलेला होता.

त्याकाळाच्या काँग्रेस मध्ये 'लाल, बाल आणि पाल' अशी तीन नावे खूप प्रभावशाली होती. यातील लाल म्हणजे पंजाब केसरी लाला लाजपतराय, बाल म्हणजेच महाराष्ट्रातील लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

आणि पाल म्हणजेच बंगाल मधील बिपिनचंद्र पाल. त्याकाळात लोकमान्यांचे राजकीय आणि सामाजिक वजन स्वातंत्र्य चळवळीत इतके जबरदस्त होते की, १९१६ च्या सुमारास एका इंग्रज अधिकाऱ्याने त्यांना विचारले होते की, आत्ता तुम्हाला आम्ही स्वातंत्र्य दिले तर तुम्ही स्वतंत्र भारताचे पंतप्रधान व्हाल ना? तर लोकमान्यांनी उत्तर दिले की, 'ज्यासाठी मी लेखणी हातात घेतली होती तो हेतू साध्य झाल्यावर मी लेखणी बाजूला ठेवून पुन्हा खडू हातात घेईन आणि गणिताचा शिक्षक होईन.' (हा संदर्भ वा. शंकर अभ्यंकरांच्या एका व्याख्यानात त्यांनी सांगितलेला ऐकला होता)

मंडालेच्या तुरुंगात लोकमान्य असताना त्यांचे वकील-पत्र मुहम्मद अली जिनांनी घेतलेले होते. जिना लोकमान्यांना खूप मानत असत. त्यावेळी जवाहरलाल नेहरू आणि मोहनदास गांधी यांचा काँग्रेसच्या क्षितीजावर उदयही झालेला नव्हता. मोतीलाल नेहरू हे लोकमान्य टिळकांचे समकालीन होते. मोहनदास गांधी आफ्रिकेहून परत आल्यावर गोपाळ कृष्ण गोखले यांच्या मवाळ विचारसरणीच्या प्रभावाखाली काम करायला लागले, तर स्वातंत्र्यवीर सावरकर हे लोकमान्य टिळकांच्या जहाल विचारसरणीच्या प्रभावाखाली काम करत होते. लोकमान्यांनी १९२० साली देह ठेवल्याने स्वातंत्र्य लढ्यात जहाल विचारसरणीचे खूप नुकसान झाले. जर लोकमान्य टिळक अजून २५-३० वर्षे जगले असते तर १९४७ साली भारताची फाळणी झाली नसती, सुभाषबाबू आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर अन्याय झाला नसता. स्वातंत्र्योत्तर भारत वेगळ्या दिशेने वाढला असता. असो.

लोकमान्य टिळक आणि स्वामी विवेकानंद हे देखील समकालिनच होते. त्यांची भेट दोनवेळा झालेली होती. पहिल्यांदा १८९२ च्या सुमारास शिकागोच्या सर्वधर्म परिषदेच्या आधी स्वामीजी जेव्हा मुंबईहून पुण्यास जात होते तेव्हा त्यांची भेट लोकमान्यांशी झाली होती. स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेत सर्वधर्म परिषदेमध्ये हिंदू धर्माचा झेंडा फडकविल्यावर तीन वर्षांनी जेव्हा ते भारतात आले तेव्हा लोकमान्यांनी स्वामीजींना त्यांच्या फोटोवरून ओळखले की, हा तोच तेजस्वी संन्यासी जो आपल्या घरी राहिलेला होता. त्यावेळी केसरी मध्ये लिहिलेल्या लेखात टिळकांनी या भेटी संदर्भात लिहिलेले होते. त्यावेळी त्यांना त्यांचे नाव माहिती नव्हते, कारण स्वामीजींनी आपले नाव न सांगता 'मी एक संन्यासी आहे' असेच सांगितलेले होते. पुढे त्यांनी त्यांची आणि स्वामीजींची भेट कशी झाली याविषयी लिहिलेले होते.

लोकमान्यही मुंबईहून पुण्यास रेल्वेने जाण्यासाठी ट्रेनमध्ये चढलेले होते आणि त्याच डब्यात स्वामीजी देखील चढले. स्वामीजींची आणि लोकमान्य टिळकांची ओळख स्वामीजींना सोडायला आलेल्या गुजराथी लोकांनी करून दिली आणि लोकमान्यांना स्वामीजींची पुण्यातील निवासाची व्यवस्था स्वत:च्या घरी करण्याची विनंती केली. लोकमान्य म्हणतात, 'त्या संन्याशाकडे दोन कफन्या आणि कमंडलू या व्यतिरिक्त काहीही नव्हते आणि त्यांचा खर्च कुणी ना कुणीतरी करत असत.' स्वामीजी कायम 'भगवतगीता आणि अद्वैत वेदांतावर' बोलत असत. लोकमान्यांकडे ते साधारण दहा दिवस राहिले होते आणि ते लोकांमध्ये फारसे मिसळत नसत असे टिळक नमूद करतात. त्या दहा दिवसांमध्ये हिराबागेपाशी डेक्कन क्लबच्या एका मीटिंगला ते लोकमान्यांबरोबर ते गेले असता स्वामीजींनी श्री काशिनाथ गोविंदनाथ यांच्या तत्त्वज्ञानावरील व्याख्यानाला अस्खलित इंग्रजीत उत्तर देऊन व्याख्यानात सादर केलेल्या दृष्टिकोनाची दुसरी बाजू सांगितली होती. याचा तेथील लोकांवर खूप प्रभाव पडलेला होता. पण त्यानंतर लगेचच स्वामीजींनी पुणे सोडले.

त्यांच्या पुण्यातील भेटी दरम्यान स्वामीजी आणि

लोकमान्य टिळक यांच्यात अद्वैत वेदांत आणि भगवतगीता यांच्यावर चर्चा झालेल्या होत्या. त्यात भगवतगीता कर्मयोग सांगते यावर दोघांचेही एकमत होते. लोकमान्य टिळक स्वामी विवेकानंदांना 'दुसरे शंकराचार्य' म्हणत असत तसे त्यांनी स्वामीजींच्या समाधीनंतर केसरीत लिहिलेल्या लेखात लिहिलेले आहे. विवेकानंदांच्या विचार आणि व्यक्तिमत्त्वाचा टिळकांच्या बौद्धिक आणि तात्विक दृष्टिकोनावर लक्षणीय परिणाम झाला, विशेषतः त्यांचे लक्ष पूर्वेकडील विचारांकडे वळवण्यात. स्वामीजींच्या पुणे भेटी दरम्यान बरेच वेळा टिळकांकडे उपस्थित असलेल्या बासूकाका या सद्‌गृहस्थांनी असे सांगितले की, स्वामी विवेकानंद आणि लोकमान्य टिळक यांच्यात अलिखित करार झाला होता. त्यांनी श्रमविभाजनावर सहमती दर्शविली होती, ज्यामध्ये टिळकांनी राजकीय राष्ट्रवादावर लक्ष केंद्रित करायचे आणि विवेकानंद यांनी धार्मिक राष्ट्रवादावर. ते तसे झालेले दिसून येते. लोकमान्य जेव्हा काँग्रेसच्या कलकत्ता येथील अधिवेशनात गेले होते तेव्हा त्यांनी स्वामीजींची बेलूर मठात भेट घेतलेली होती. त्यावेळी स्वामीजी त्यांना म्हणाले होते की, 'तुम्ही सर्वसंगपरित्याग करून बंगालमध्ये माझे काम करा आणि मी महाराष्ट्रात तेच काम करतो. कारण आपण जिथे जन्मलेलो असतो तिथे आपल्या कामाची किंमत होत नाही.'

स्वामी विवेकानंदांच्या भेटीनंतर त्यांचे विचार पौर्वात्य विचारांकडे वळल्यानंतर त्यांनी १८९३ मध्ये द ओरियन किंवा रिसर्चेस इनटू द अँटिक्विटी ऑफ द वेद हे विद्वत्तापूर्ण पुस्तक लिहिले. हे पुस्तक वेदांमध्ये, प्राचीन हिंदू धर्मग्रंथांमध्ये खोलवर जाऊन त्यांच्यामध्ये आढळणाऱ्या खगोलीय संदर्भांच्या आधारे त्यांच्या प्राचीनतेचा युक्तिवाद करते. टिळकांनी खगोलशास्त्र आणि संस्कृतच्या ज्ञानाचा वापर करून वैदिक उताऱ्यांचे विश्लेषण केले आणि असा युक्तिवाद केला की, वेदांमध्ये अशा खगोलीय घटनांचे संदर्भ आहेत ज्या केवळ हजारो वर्षांपूर्वी घडल्या असतील. टिळकांच्या सिद्धांतात 'मृग (ओरियन) नक्षत्र' एक महत्त्वाचा घटक म्हणून काम करते, कारण टिळकांनी या प्राचीन खगोलीय संदर्भांचा उलगडा करण्यासाठी मृग नक्षत्राचा वापर केलेला आहे. थोडक्यात, 'द ओरियन' हे पुस्तक टिळकांच्या वैज्ञानिक कुतूहलाचे आणि प्राचीन भारताच्या कालखंडाबद्दल आणि त्याच्या ज्ञान प्रणालींबद्दलच्या प्रचलित समजुतींना आव्हान देण्यासाठी खगोलशास्त्र आणि गणित यासारख्या विषयांचा वापर करण्याचे कौशल्य दाखवते. ओरियन हे वैदिक अभ्यासात एक अभूतपूर्व योगदान मानले जाते आणि त्यामुळे वेदांचे वय, भारतीय इतिहास आणि त्यांचे भारतीय संस्कृतीतील महत्त्व समजून घेण्यास मदत होते. या पुस्तकाचे फ्रेंच भाषेत भाषांतरही प्रसिद्ध आहे.

याच पुस्तकाचा पुढचा भाग म्हणून त्यांनी १८९८ मध्ये 'द अर्क्टिक होम ऑफ वेदाज' हे दुसरे पुस्तक लिहिले, की ज्यात त्यांनी इंडो-आर्यन लोकांचे मूळ जन्मस्थान आर्क्टिक प्रदेशात होते असा युक्तीवाद केलेला आहे. टिळकांनी वैदिक स्तोत्रे, अवेस्तातील (अवेस्ता हा पर्शियन प्राचीन ग्रंथ आहे) परिच्छेद आणि वैदिक कालगणनेचे विश्लेषण करून, 'हवामान बदलामुळे ८००० ईसापूर्व दरम्यान आर्यांनी आर्क्टिकमधून स्थलांतर केले होते' असा सिद्धांत मांडलेला आहे. या पुस्तकाचे त्याच्या व्यापक संशोधनासाठी कौतुक झाले असले, तरी काही समीक्षक पुस्तकाच्या संपादनामधील समस्या आणि त्याच्या पुरातत्त्वीय आणि वैज्ञानिक माहितीच्या कालबाह्य स्वरूपाची नोंद करतात. हे पुस्तक २० व्या शतकाच्या सुरुवातीला, अनुवंशशास्त्र आणि पुरातत्त्वशास्त्र यांसारख्या क्षेत्रात लक्षणीय प्रगती होण्यापूर्वी लिहिले गेले होते हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. आपल्यासाठी लोकमान्य टिळकांनी त्या काळात हे अशा प्रकारचे ग्रंथ लिहिले हेच अभिमानास्पद आहे. जर या ग्रंथांचे परदेशी

शर्यत हरण्यात कसलाच कमीपणा नाही.
पण हरण्याच्या भीतीने शर्यतीत भागच न घेण्यात 'खरा कमीपणा' असतो!

भाषांत भाषांतर केलेले असेल तर भारतीय असलेल्या आपल्या टिळकांनी लिहिलेल्या ग्रंथांचे आपण मराठीत भाषांतर का करू नये? कमीतकमी त्यांचा सिद्धांत आणि युक्तीवाद हे जरी आपल्याला समजले तरी खूप होईल. टिळकांनी ब्रह्मदेशात मंडाले येथे तुरुंगात असताना श्रीमतभगवतगीतेवर टीका (कर्मयोगावर आधारित) 'गीतारहस्य' हा एक विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहिला. या ग्रंथाला महाराष्ट्रात चांगली प्रसिद्धी मिळाली आणि त्याचे इंग्रजीतही भाषांतर झाले.

स्वामी विवेकानंद आणि लोकमान्य टिळक हे दोघेही समकालीन होते. स्वामी विवेकानंद आणि लोकमान्य टिळक या दोघांकडेही प्रखर बुद्धीमत्ता आणि राष्ट्रवाद होता, पण त्यांची कार्यक्षेत्रे भिन्न होती. स्वामी विवेकानंदांना जितकी प्रसिद्धी जगभरात मिळाली (त्यामुळे देशातही) तितकी प्रसिद्धी लोकमान्य टिळकांना देशात देखील मिळाली नाही. किंबहुना एका कालावधीनंतर काही कारणांनी त्यांची उपेक्षाच झाली. अजूनही आपल्याला त्यांचे हे गणित आणि खगोल-शास्त्रातील योगदान माहिती नाहीये. याचे एक कारण असेही असू शकते की, स्वामी विवेकानंदांना त्यांच्या गुरूंचे म्हणजेच श्री रामकृष्णांचे मार्गदर्शन कायम लाभले, म्हणजे त्यांच्याकडे गुरुकृपा होती. पण टिळकांच्या बाबतीत त्यांचे कुणी आध्यात्मिक गुरू असल्याची माहिती अस्तित्वात नाही. त्यामुळे टिळकांकडे गुरुकृपा नव्हती असा एक तर्क असू शकतो. असो. स्वामी विवेकानंद आणि लोकमान्य टिळक या दोघांकडूनही आपल्याला आयुष्यात प्रेरणाच मिळते यात मात्र शंका नाही.

**– डॉ. अपर्णा लळिंगकर**
अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
संपर्क : ९७४२० ४५७८५

## ।। वास्तू तथास्तु ।।

वास्तूशास्त्र बघताना आपल्याला बऱ्याच गोष्टींचा विचार करावा लागतो. वास्तू ही पंच महाभूतामुळे बनलेली आहे. त्यामुळे तशा दिशा ठरलेल्या आहेत. त्या दिशांनुसार आपल्याला घराचे वास्तुशास्त्र ठरवता येते.

वास्तुशास्त्राचा अभ्यास करताना दिशा, उपदिशा ह्या पण बघाव्या लागतात. मुख्य दिशा ४ असून त्याचा आपण जास्त विचार करतो. तर उपदिशांमध्ये चार वेद सामावलेले आहेत. सर्व सृष्टी ब्रह्मदेवांनी निर्माण केली असल्याने वास्तुतील ब्रह्मतत्त्व महत्त्वाचे समजले जाते. घराचा मध्यभाग हा ब्रह्मतत्त्वात.

घर बघतो तेव्हा म्हटले जाते, – वास्तु कशी आहे? त्या त्या दिशांप्रमाणे प्रत्येक खोल्यांचे स्थान आहे की नाही? कारण ते जर प्राप्त झाले तर आपल्या वास्तुतील स्पंदने चांगली राहण्यास मदत होते. प्रगतीला चालना मिळते. जसे स्वयंपाकघर हे जर आग्नेय दिशेत असेल तर तिथे स्वयंपाक चांगला होतो. स्त्रीचे आरोग्य चांगले राहते. स्त्रीचे आरोग्य चांगले राहिले तर घर चांगले राहते. तिच्यावर घराची पूर्ण जबाबदारी असते. असेच प्रत्येक दिशांचे असते. जसे मास्टर बेडरुम ही नैऋत्य दिशेत असावी. देवघर हे ईशान्य भागात असावे. घराचा दरवाजा पूर्व ईशान्य भागात असल्यास पैशांची चणचण जाणवत नाही. लक्ष्मी प्रसन्न राहते.

असे सर्व बघता आपल्याला वास्तु चांगली लाभली तर भविष्य चांगले घडते. कार्यक्षेत्रात कर्त्या पुरुषाला, तर स्त्रीला सुद्धा वास्तूप्रमाणे दिशा मिळाल्यास आरोग्य व ती कायम कार्यक्षम राहते.

**– सौ. सविता करंदीकर**
पुणे

# देउनिया अपुरेपण रक्षिसी मला पुरेसा..

*दिनांक ३ ऑगस्ट रोजी संस्कार भारतीच्या वतीने 'तपस्वी' चित्रपट दिग्दर्शक पद्मभूषण आदरणीय राजदत्त आणि कलासाधक चित्रकार आदरणीय पद्मश्री वासुदेव कामत ह्यांच्या कलाबोध उलगडणाऱ्या आत्मीय संवादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याचे नयनरम्य शब्दांकन ज्येष्ठ लेखक प्रमोद बापट यांनी प्रस्तुत लेखात केले आहे. – संपादक*

अत्यंत प्रिय प्रसंग असे पिसासारखे हातातून निसटून जावेत, अथवा कळस दूर दिसत असतानाच गाव सोडावं लागावं असं झाल्यावर जे हताशपण असतं ना तेच आज.. म्हणजे काल संध्याकाळपासून अनुभवलं.

मुंबईपासून काही काळ असं दूर येताना असं वाटत नव्हतं. कारण तेव्हा प्रसंगाचा घोष झाला नव्हता, कळस तर राहो, मंदिराच्या वाटेचाही मागमूस नव्हता. पण दूर आल्यावर लगेचच एका विशेष प्रसंगाचा प्रस्ताव समोर आला. संवादातून कलाबोधाचं एक अनुपम मंदिर उभं राहील अशा मंदिरवाटेचा घंटारव सुरू झाला.

तो प्रसंग होता तपस्वी चित्रपट दिग्दर्शक पद्मभूषण आदरणीय राजदत्त आणि कलासाधक चित्रकार आदरणीय पद्मश्री वासुदेव कामत ह्यांच्या कलाबोध उलगडणाऱ्या आत्मीय संवादाचा.. ज्याचं शीर्षक होतं 'अभ्यासोनी प्रकटावे!' ह्या कलाबोध संवादयागाचं संवादक पौरोहित्य करणार होते 'चतुरंग' प्रवर्तक सन्मित्र विद्याधर निमकर.

असा एकूणच कलाबोधाचं प्रयागतीर्थच मुंबईच्या रवींद्र नाट्यमंदिरात अवतरणार होतं. तो सोहळा सुफळ संपूर्ण करूनच तो दिनांक कालच मावळला.. दिनांक ३ ऑगस्ट २०२५.

त्या कालावधीत मी मात्र त्या प्रसंगापासून, त्या गावापासून दूर होतो. काय करावं.. कशातच मन रमत नव्हतं.

रामधारी सिंह दिनकर ह्यांच्या कवितेची एक ओळ आठवत होती..

''बाण ही होते विचारों के नहीं केवल
स्वप्न के भी हाथ में तलवार होती हैं ।।''

विचारांच्या समोर स्वप्नाचे आव्हान वा पर्याय दिनकरजींनी ठेवला होता. आणि स्वप्न जर शस्त्रसिद्ध होऊ शकतं तर ते अंतर कापून काढणारं खड्गंही होऊ शकेल. आणि आपल्याला थेट त्या प्रसंगात घेऊन जाईल. मनानं निश्चयाने स्वप्नवाट धरली. त्या वाटेने मुंबई गाठावी, प्रभादेवीचं रवींद्र नाट्यमंदिर गाठावं अशी ओढ लागली.

आणि शिणल्यावर अंगावरून झुळूक जावी तसं हलकं वाटलं.

संजय गोडसे, उदय शेवडे ह्या मित्रद्वयांसह संस्कार भारतीशी संबंधित अनेक सुहृदांची लगबग दिसू लागली. 'रवींद्र'च्या दारासमोर स्वागताची रांगोळी ओलांडून आत न जाता तिथेच ते पहात रेंगाळणारा समुदाय दिसला. संस्कार भारतीचे अखिल भारतीय संघटनमंत्री मा. दादा गोखले पाच-सहा कार्यकर्त्यांच्या गोतावळ्यात दिसले. ज्येष्ठ सन्मित्र विद्याधर निमकर खांद्यात रुतलेली झोळी घेऊन निघालेले दिसले... तसंच अत्यंत आश्वासक स्मित मुद्रेवर विलसत होतं. हे जवळपास गेली चाळीसएक वर्षं पाहतोय. गंमत म्हणजे दाढीइतकंच ते

मुद्रेचा भाग झालं आहे. आजच्या त्रिवेणीतला एक प्रवाह त्याच्या स्वरूपात दिसला, पण आजच्या दोन पुण्यधारा कुठे दिसत नाहीत. त्यात नवल नाही, ते कार्यक्रमाच्या वेळेआधीच येऊन पोहोचले असतील. आत रंगपिठात स्वर जुळवत असतील. ते आता कार्यक्रमप्रारंभाच्या तोंडावर बाहेर भेटणं अशक्यच.

विद्याधरजींना रामराम करायचा राहिलाच. तसं काहीच मिनिटांपूर्वी झालेलं बोलणं आठवत होतो. समर्थांनी जाणत्याची लक्षणं सांगताना 'अभ्यासोनी प्रकटावे' हे एक महत्त्वाचं लक्षण नोंदवल्याचं त्यांनी ससंदर्भ सांगितलं. ते म्हणाले आज जाणत्यांचं ऐकायचंय. कमलपुष्प फुलून यावं तशी आजची ही दोन्ही व्यक्तिमत्त्वं. कमळ क्रमाक्रमाने उमलत जातं, तसंच मा. दत्ताजी आणि मा. वासुदेवजींचं. स्वसाधनेने उमलत जायचं आणि भवतालाला रूप, गंधाने समृद्ध करायचं हेच ह्यांचं जीवितकार्य.

कमी शब्दांत.. कमी वेळात विद्याधरजी खूप सांगून गेले. त्याने लावलेल्या अन्वयातून कार्यक्रमाचं प्रयोजन आणि त्यासाठी समोर आणलेल्या प्रतिमा एकदम उजळून निघाल्या. आमचं बोलणं थांबलं. पण मी मात्र त्याच थांब्यावर होतो. विशेषतः फुलणाऱ्या कमळांचं रूपक ऐकल्यावर मी त्या कमळवाटेवर भ्रमत राहिलो.

आपल्या परंपरेत फुलांच्या फुलण्याला 'विकास' असं म्हटलं आहे. त्यातूनच कमळांच्या 'चंद्रविकासी' म्हणजे चंद्रप्रकाशाने उमलणारी जिलाच 'कमोदिनी वा कुमुदिनी' म्हणतात, तर काही 'सूर्यविकासी' म्हणजे सूर्याच्या उगवण्याबरोबर उमलणारी कमळं..

त्यामुळे फुलणं म्हणजे केवळ शोभिवंत होणं नसून तो एक विकास असतो. म्हणजेच त्याच्यासमोर एक गंतव्य असतं, हेतू असतो. आणि पुढे जाऊन तो केवळ स्वतःसाठी नसतो. स्वप्रेरित असतो, पण स्वकेंद्रित नसतो.

स्वा. सावरकर येसूवहिनींना लिहिलेल्या अमर पत्ररूपी कवितेत म्हणालेत –

अनेक फुले फुलती । फुलोनिया सुकोनी जाती ।।
कोण तयांची महती, गणती । ठेविली असे? ।।

परि जे गजेंद्रशुंडेने उपटिले । श्रीहरीसाठी मेले ।।
कमळफूल ते अमर ठेले । मोक्षदा ते पावन ।।

अशीच सर्व फुले खुडवी । श्रीरामचरणी अर्पण व्हावी ।।
काही सार्थकता घडावी । ह्या नश्वर देहाची ।।

अमर होय ही वंशलता । निर्वंश जिचा देवांकरिता ।।
दिगंती पसरे सुगंधता । लोकहितपरिमलाची ।।

असं पूर्ण समर्पण हेच प्रयोजन ठेवून फुललेली मा. राजदत्तजी आणि मा. वासुदेवजी ही दोन कमळं आहेत असं म्हणावंसं वाटलं.

म्हणजे पूर्ण साधना करून म्हणजेच अभ्यासोनी फुलायचं, आणि प्रकटायचं, व्यक्त व्हायचं ते इतरांना सुगंध, सौन्दर्य देण्यासाठीच..

संघात म्हटल्या जाणाऱ्या एका गीताचं ध्रुवपद आहे :

'विकसित व्हावे, अर्पित होऊनी जावे ।।'

त्याचीच जणू ही दोन मूर्त रूपं..

पण आज इथे बाहेर प्रवेशद्वाराशी ती दोन्ही कमलपुष्पं दिसली नाहीत. मी असा स्वप्नखड्गं घेऊन इथवर तर आलो होतो. पण ह्यापुढे मात्र खड्गं संन्यस्त करावं लागलं. कारण ती प्रत्यक्ष 'यागभूमी' होती, प्रयोगभूमी होती.

मी पुन्हा अस्वस्थ झालो. प्रवेशालाच गुरुदेव रवींद्रनाथांची ध्यानस्थ प्रतिमा दिसली. त्यांनाच साकडं घालावंसं वाटलं. तसं घातलंही. पण ते समजूत काढावी असं प्रसन्नतेनं पहात उबदार हसले. माझ्या मनात आलं

दररोज कोणाच्या तरी आनंदाचे कारण बना.
तुम्हाला यातून मिळणारा आनंद तुम्ही दिलेल्या आनंदापेक्षा जास्त असतो!

की, अरेच्या, प्रत्यक्ष गुरुदेवही बाहेरच आहेत की.. मग आपलं काय? तेवढीच मनावर फुंकर पडली. पण असं वरवरचं कोमट समाधान करतील तर ते रोबीदा कुठले?

जणू त्यांनी माझ्या मनात एक कागद उघडला. त्यांचेच शब्द होते.

गुरुदेवांचीच एक कविता होती. गीतांजलीतील चौदावं गीत होतं ते..

आमी बोहू बासोनय प्राणपने चाय
बोन्चिटो कोरे बनाचले मोरे।

मनात अर्थ उलगडत होता. माझा हट्ट खरा होता. पण तो पुरवायलाच हवा का? न मागताही काही मिळालंय ना.. हेही मागावंसं वाटतंय कारण ह्याआधी हेच वा ह्यासंबंधित असं मोलाचं काही मिळालंय.. अपुरेपणातून पूर्णत्वाकडे असंच जायचं असतं का? असंच जावं लागतं का?

रवींद्र नाट्यमंदिरात एका सखोल जीवनानुभवातून मिळविलेल्या कलाबोधातून पूर्णत्वाचं निरूपण सुरू होतं.. आणि बाहेर साक्षात गुरुदेव रवींद्रनाथ वेगळ्या शब्दांत 'पूर्णात पूर्ण मुदच्यते... ' उलगडून सांगत होते.

आता केवळ फुंकर नव्हती. निसटलेल्या क्षणांकडे मी अलिप्त होऊन पाहात होतो. 'अभ्यासोनी प्रकटावे' अनुभवण्यासाठी अजून काही काळ अभ्यासमग्नतेत काढावा लागेल..

आता ते करू या असं म्हणत स्वप्न म्यान केलं. सत्य स्वीकारलं. गुरुदेव म्हणालेत तसं मागितल्याविनाच आजचा कलाबोध कुणी माझ्या झोळीत टाकील.

तोपर्यंत.. अभ्यासी असावे असा आत्मबोध स्वीकारायला हवा.

(गुरुदेवांची मूळ कविता 'गीतांजली' चा भाग आहे. गीतांजलीमधील गीत क्र. १४ ते आहे. त्या गीताचा भावानुवाद पुढे सविनय देतोय.)

**प्राणांहूनही प्रियतम मजला किती वासना..**

प्राणांहूनही प्रियतम मजला किती वासना
वाचविले तू वंचित ठेवुनी सांग मला ना ।
असे गाठिशी, संचित इतुके तूच दिलेले
मागितल्याविण दिलेस इतुके तयां तुला ना ।।

नभासवे आभा, तन-मन, प्राणांतील ऊर्मी
भाग्याच्या भोगास्तव व्हावे जणू योग्य मी ।
स्वैर अधाशी ऐशा आकांक्षांना माझ्या
म्हणूनि धरिसी काय रोखुनी तुझ्या लगामी ।।

मी वाटेवर कधी चालतो, कधी भुलतोही
गंतव्याचे गाव तुझे का? मिळवित ग्वाही ।
दिसता दिसता दृष्टीपुढुनी हटशी निष्ठुरा
गमे तरी तव कृपाच भरली दिशांत दाही ।।

कुशीत घेण्या पुन्हा मला तू भ्रमविसी ऐसा
करिसी मज तू तसा जसा तुज असे हवासा ।
अपुऱ्या इच्छांच्या अतृप्ती-आपत्तीतून
देउनिया अपुरेपण रक्षिसी मला पुरेसा ।।

**- प्रमोद वसंत बापट**
ज्येष्ठ लेखक
बोरिवली

दिशा
नियमित
वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

भावनांचा आणि वेदनांचा कधीच हिशोब लावता येत नाही, त्या ज्याच्या त्यालाच कळतात...

# स्त्री चित्रकार

*‘बॉंबे स्कूल परंपरेतील स्त्री चित्रकार (१८५७ - १९५०)’ हे कला समीक्षक साधना बहुलकर लिखित पुस्तक नुकतेच वाचले. नोव्हेंबर २०२१ मधे राजहंस प्रकाशनाने ते प्रसिद्ध केले आहे. - संपादक*

खरं म्हणजे, माझा आणि चित्रकलेचा दुरान्वयेही संबंध नाही.

आजपर्यंत आलेला नाही.

पुढे येण्याची शक्यता नाही.

ना त्या क्षेत्रात मला गती आहे; ना त्या क्षेत्राबाबत मला मती आहे.

हातात पट्टी घेऊनही कागदावर सरळ रेष मला काढता येणार नाही याची माझी मीच (आणि मलाही) खात्री देतो इतकी गती मला या क्षेत्रात आहे!

तरीही हे पुस्तक मी वाचले ...

वाचले अगदी वेगळ्या कारणासाठी.

मी दुसरेच पुस्तक विकत घ्यायला राजहंसच्या मुंबई कार्यालयात गेलो होतो. तिथे पुस्तक चाळताना मला हे पुस्तक दिसले. पुस्तकाच्या शीर्षकाने मी चक्रावलो. मनात निष्कारण प्रश्न पडला की, या विषयाची माहिती लेखिकेने कशी मिळवली असेल?

कारण माझ्या व्यावसायिक आयुष्यात एका नामवंत संस्थेत काम करत असताना, त्या संस्थेच्या कारकिर्दीचा इतिहास सांगणारे कायमस्वरूपी म्युझियम निर्माण करण्याचा विचार ती संस्था करत होती. त्या प्रकल्पाचा प्रमुख म्हणून मी काम करणे अपेक्षित होते. पण त्याबाबतची अधिकृत माहिती मिळता मिळत नव्हती. त्यामुळे तो प्रकल्प सुरूच झाला नाही.

ती संस्थाही १८५७ पासून आपल्या देशात कार्यरत आहे.

म्हणून या पुस्तकाच्या शीर्षकात असणाऱ्या १८५७ या वर्षाने माझे कुतूहल जागृत झाले.

एकंदरीतच, पुस्तकातील माहिती इतकेच ती माहिती मिळवण्याची प्रक्रिया या मुद्यावरही मनातल्या मनात फुकटच्या चौकशा !

आता ना मला त्या व्यावसायिक क्षेत्राशी काही देणे-घेणे आहे; ना चित्रकलेची मला काडीचीही माहीती आहे.

पण तरीही रिकाम्या वेळेतल्या रिकाम्या मनाचे चाळे म्हणून मी हे पुस्तक तेंव्हा विकत घेतले...

एकमेकांना पूरक ठरतील असे वाटल्याने साधना बहुलकर यांचे हे पुस्तक आणि त्यांचे पतिराज / यजमान चित्रकार सुहास बहुलकर यांची ३ पुस्तके अशी ४ पुस्तके त्यावेळी एकदम विकत घेतली ....

त्यामुळे या पुस्तकाचे पानही उघडण्याआधीच दोन गोष्टी लक्षात आल्या ....

पहिली म्हणजे;- चित्रकला हे खर्चिक काम आहे ... वेळ, पैसा, परिश्रम, संयम, एकाग्रता अशा सगळ्याच अर्थाने.

आणि दुसरे म्हणजे चित्रकला हे डोके सतत ठिकाणावर ठेवून ठेवण्याची बाब आहे ... ध्यान, धान, अवधान, प्रसंगावधान या सगळ्याच अर्थाने!

---

मन दुखावल्यावर दाखविलेलं प्रेम आणि दुर्लक्ष केल्यावर दिलेलं महत्त्व याचा काही उपयोग नसतो!

यांपैकी कोणतीच गोष्ट माझ्याजवळ नसल्याने, 'चित्रकला ही गोष्ट मला माझ्या उभ्या आयुष्यात जमली नाही आणि जमणारही नाही' ही गोष्ट या पुस्तकाने मला शिकवली.

चित्रकला ही गोष्ट कठीण आहे आणि ती नंतरही निगुतीने जपत राहणे हे किती कर्मकठीण आहे आणि त्यातही स्त्री चित्रकारांना त्यासाठी कोणकोणत्या गोष्टींना, प्रसंगाना सामोरे जाणे किती कठीण आहे हे माउलीच्या ममतेने वाचकाला हे पुस्तक सांगते.

त्यामुळे या पुस्तकाचा केंद्रबिंदू 'स्त्री चित्रकार' आहे हा योगायोग नसतो ...

स्त्री एक आई म्हणून आणि स्त्री एक सरस्वती म्हणूनही !

हे पुस्तक हातात घेतल्यापासून मला माझे इयत्ता आठवीचे दिवस आठवत होते. कारण ते एकमेव वर्ष आहे जेव्हा मला चित्रकलेत १०० पैकी ७५ पेक्षा जास्त मार्कस् होते ...

त्यावर्षी माझी चित्रकला एकदम सुधारली नव्हती; तर त्यावर्षी प्रत्यक्ष चित्र काढण्याला ५० मार्कांची परीक्षा होती आणि बाकीच्या ५० मार्कांची 'चित्रकलेचा इतिहास' असा लेखी पेपर होता ...

त्यावेळी 'बॉम्बे स्कूल परंपरा' असा उल्लेख वाचला आहे असे आता निष्कारणच वाटते आहे.

शास्त्रीय संगीतात गायक/गायिकांची असतात ती 'घराणी' आणि चित्रकला - शिल्पकला यांची असतात ती 'स्कूल!'

रागाची चौकट जरूर आखून देतात घराणी; पण त्याच्या अंतर्गत 'स्वर - विस्ताराची, भाव - विस्ताराची मुभा असते' हा मुद्दा चित्रकला आणि शास्त्रीय संगीत यातला एक समान मुद्दा आहे.

दोन्हीकडे मुळात कला क्षेत्रालाच सामाजिक भावविश्वाच्या उतरंडीत असणारे दुय्यम स्थान, आणि त्यातही स्त्री कलाकारांना मिळणारी आणखीनच जास्त दुय्यम वागणूक हेही या दोन क्षेत्रांतील साम्य आहेच की !

अँजेला त्रिंदाद (१९०९-१९८०),

चित्रकला आणि शास्त्रीय संगीत या दोन्ही क्षेत्रांत पारंगत अशा अंबिका धुरंधर (१९१२ - २००९),

प्रसिद्ध साहित्यिक दुर्गाबाई भागवत यांच्या धाकट्या भगिनी व स्वातंत्र्य लढ्यात तळमळीने सहभागी असलेल्या, तसेच आकाशवाणीसाठी गाण्याचे कार्यक्रम केलेल्या विमल भागवत गोडबोले (१९१३ - १९८१),

अँग्लो - इंडियन मारी हेंडरसन - टेंपल (१९०८-१९९७),

मूळच्या रशियन असणाऱ्या मग्दा नाखमन आचार्य (१८८९ - १९५१), अमृता शेरगील (१९१३-१९४१)

आणि -

आणखी काही स्त्री चित्रकार यांच्या कारकिर्दीचे शब्दांकन करणारे हे पुस्तक वाचताना नकळत नोंद केलेली गोष्ट म्हणजे ....

१८५७ साली खऱ्या अर्थाने अस्तित्वात आलेल्या जे.जे. स्कूल आणि मुंबई शेअरबाजार (बीएसई) या दोन्ही संस्थांच्या उभारणीत - स्थिरावण्यात महत्त्वाचा हातभार असणारी एक समान व्यक्ती म्हणजे जमशेदजी जिजिभोय!

आज या दोन क्षेत्रांचे वेगवेगळ्या अर्थाने एकमेकांशी असणारे साम्य आणि परस्पर परावलंबित्व हा कालवश योगायोग .... !

---

स्तुतीत 'लपलेलं खोटं' आणि टिकेत 'लपलेलं सत्य' ज्याला कळालं
त्यालाच चांगल्या आणि वाईटाची ओळख आपोआप समजते!

मुंबई शेअरबाजार आणि जे. जे. स्कूल या दोन्ही संस्थानी त्यांच्या सध्याच्या जागेत स्थलांतर करण्याआधी प्रत्येकी दोन वेगवेगळ्या ठिकाणी कारभार केला आहे हे या दोन संस्थांतले दुसरे साम्य !!

'वास्तववादी शैली' (दिसते तसे काढणे) म्हणजे बॉम्बे स्कूल.

आणि त्याचा आपल्या देशातील पहिला संस्थात्मक प्रणेता म्हणजे जे. जे. स्कूल. ... एकंदरीतच जमशेदजी जीजिभोय यांचा हातभार असणाऱ्या जे. जे. स्कूल आणि मुंबई शेअरबाजार या दोन्ही संस्थांचा "As is, where is" या तत्त्वावर असणारा विश्वास हे या दोन संस्थांतले तिसरे साम्य !

या दोन्ही संस्थांना त्यांच्या त्यांच्या सुरुवातीच्या काळात जमशेदजी जिजोभोय यांनी त्यावेळच्या प्रत्येकी एक लाख रुपयांची देणगी दिली हे या दोन संस्थांतले चौथे साम्य !

या दोन्ही संस्थांच्या इमारतींना त्यांचेच नाव दिले आहे हे त्यातले पाचवे साम्य ! ( मुम्बई शेअरबाजाराच्या २८ मजली इमारतीचे नाव आहे 'जीजीभोय टॉवर्स')

मला हे पुस्तक वाचावे याची आंतरिक ओढ लागावी याचे हे कारण असावे का? भारतीय शेअरबाजारातील माझ्या कारकिर्दीची सुरुवात मी मुंबई शेअरबाजारात केली; तर या पुस्तकाच्या लेखिका आणि काही नायिका यांनी त्यांच्या चित्रकला क्षेत्रातील कारकिर्दीचा श्री गणेशा जे. जे. स्कूल ऑफ आटर्स मधे केला आहे.

म्हणजे आमच्या सगळ्यांचे आजोळ एकच !

ही भावना इतकी प्रबळ की, त्या ओघातच हा अखखा लेख एकटाकी लिहिला गेला ....

तसेही चित्रकला आणि शेअरबाजार या दोन्हींचा चालक आणि कारक 'भावना' !

आहे ते बघावे (बॉम्बे स्कूल) म्हणजे परफॉर्मन्स आणि मुक्तपणे चित्रीत करावे म्हणजे perception या दोन्हींचा संगम चित्रकला आणि शेअरबाजार या दोन्ही ठिकाणी करावा लागतो हेही साम्यच की!!!!!

या पुस्तकात जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या विद्यार्थिनी आणि १८८८ साली ब्रिटिश मंडळीनीच स्थापन केलेल्या बॉम्बे आर्ट सोसायटीच्या प्रदर्शनात सहभागी झालेल्या स्त्रिया अशा दोन्ही प्रकारच्या निवडक कलाकारांचा 'बॉम्बे स्कूल' म्हणून परिचय या मोठ्या आकाराच्या १६८ पानी पुस्तकात करून दिलेला आहे. (किंमत २५० रुपये)

या पुस्तकाच्या नायिकांचा प्रत्येकी स्वतंत्र प्रकरणात सविस्तर परिचय करून देण्याआधी बॉम्बे स्कूल कला परंपरेची पार्श्वभूमी आणि स्त्रियांचे कलाशिक्षण ही दोन प्रकरणे (कदाचित) उपोदघात म्हणून येतात. ही दोन प्रकरणे मिळून असणारी २२ पानी छापील मजकूर असा आहे की त्यातील शब्द न शब्द पुन्हा पुन्हा वाचावा. कलेतून निर्माण होणारे आत्मभान आणि समाजभान याचा ज्वलंत इतिहास आहे हा ...

या पुस्तकातील ही दोन प्रकरणे वाचत असताना मला सारखे वाटत होते की, विवेकानंद केंद्र मराठी प्रकाशन विभागाने प्रकाशित केलेले आणि आमच्या आदिती जोगळेकर-हर्डीकर यांनी लिहिलेले 'कला आणि राष्ट्रविचार' हे पुस्तकही आवर्जून याचवेळी वाचले पाहिजे. (प्रस्तुत पुस्तकाच्या लेखिका साधना बहुलकर यांचे पती ज्येष्ठ चित्रकार सुहास बहुलकर यांनीच आदिती जोगळेकर-हर्डीकर यांच्या या पुस्तकाचे मुखपृष्ठ केले आहे.)

---

दुसऱ्याला एखादी गोष्ट सांगणे खूप सोपे असते. अगोदर स्वतःच्या जीवनात परिवर्तन होणे महत्त्वाचे असते.

या पुस्तकातील ही दोन प्रकरणे, आदिती जोगळेकर-हर्डीकर यांचे पुस्तक आणि त्या काळातील एकंदरीतच राष्ट्रीय भावनेसाठी कला क्षेत्राची भूमिका याबाबत लोकमान्य टिळकांनी केलेले लेखन यांचा एकत्रित विचार केला तर 'बॉम्बे स्कूल, बेंगाल स्कूल' यांच्या योगदानाची कल्पना, तसेच पार्श्वभूमी स्पष्ट होते.

ओले रंग,

अस्पष्ट व ठळक रेषा

आणि प्रज्वलित प्रकटीकरण ....

साधना बहुलकर लिखित या पुस्तकाच्या पहिल्या दोन प्रकरणांत सुरुवातीच्या काळातील अनेक विद्यार्थिनींचा उल्लेख आहे. पण काही अगदी मोजके अपवाद वगळता त्यांच्यापैकी बहुतेकजणी नंतरच्या काळात कला क्षेत्रात कार्यरत राहिल्या नसाव्यात हाही उल्लेख अनेकदा येतो ...

का कोण जाणे ?

हा उल्लेख या पुस्तकात वारंवार वाचताना असे वाटायला लागले की, अनुराधा किंवा अभिमान चित्रपटात दाखवल्यासारखे तर इथेही होत नसावे ना !

की एकंदरीतच कला क्षेत्राला डावलण्याचा तो जमाना असावा ?

की स्त्री कलाकार म्हणून ?...

की या सगळ्याचा तो एकत्रित परिणाम?

त्यावेळी जे. जे. स्कूल मधील वातावरण कसे असे याचे 'चित्रदर्शी वर्णन' या प्रकरणात येते. ते मुळातूनच वाचण्याजोगे आहे.

तरीही एक नोंद सांगतो. स्त्रिया त्याकाळी साधी सरळ मांडी घालून बसत नसत. तसे बसणे पुरुषीपणाचे व विनयशील नसण्याचे समजले जायचे !

या पुस्तकाच्या ६ नायिकांच्या सविस्तर वर्णनातले मुद्दे जाणीवपूर्वक इथे घेत नाहीये. कारण तसे करणे या पुस्तकाच्या लेखनासाठी साधना बहुलकर मॅडमनी घेतलेल्या प्रयासाचा अवमान करणे ठरेल.

ते टाळण्यासाठी मूळ पुस्तकच वाचले पाहिजे.

पण या ६ नायिका वाचत असताना मायकेल अँजेलो या प्रसिद्ध चित्रकाराचे एक वाक्य मला सारखे आठवत होते ....

मायकेल अँजेलो म्हणतो ...

चित्र आणि संगीत या दोन बाबींतले महत्त्वाचे साम्य म्हणजे ते आधी मनात उमलते आणि मग प्रयत्नाने प्रकट होते. मनाची ही श्रीमंती टिकविण्याचा रियाझ मात्र करत रहावा लागतो.

या निरंतर प्रयत्नांच्या अखंड प्रवासाच्या पूर्वासूरी म्हणजे या ६ स्त्री चित्रकार !

प्लुटोच्या आदर्श राज्यात कवी मंडळींना स्थान नव्हते हे माहीत होते.

हे पुस्तक वाचल्यावर आदर्श राज्यात चित्रकारांना स्थान नव्हते किंवा नसते असे म्हणता येईल का? असा प्रश्न पडायला लागला.

कारण या पुस्तकाचा जो काळ आहे (१८५७ ते १९५०) त्यात लक्षात येणारी गोष्ट ही आहे की, त्या काळात चित्रकलेला संस्थानिकांनी आश्रय दिला, आधार दिला, प्रसंगी उभारी दिली.

सगळेच संस्थानिक असे करत नसतीलही ...

पण काही संस्थानिकांनी तरी हे काम नक्कीच केले. म्हणून चित्रकला आपल्या देशात जतन झाली.

ही परंपरा नंतरही मर्यादित प्रमाणात का होईना

चालू राहिली असावी. वि. स. खांडेकर यांच्या कादंबरीवर आधारित 'अमृतवेल' नाटकात तो संस्थानिक जसा शिकारी आहे तसाच तो चित्रकारही आहे.

आपले माजी पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंग, जे मूळचे संस्थानिक आहेत, तेही चित्रकार होते. ते नेहमी म्हणत असत की, शायरी आणि चित्रकला याचे बाळकडू मला लहानपणापासूनच घरी मिळाले आहे. दुसऱ्या टोकाला जायचे तर डॉल्फ हिटलरही चित्रकार होताच की !

'संस्थानिकांचे कला योगदान' हे या पुस्तकातील प्रकरण या संदर्भात आवर्जून लक्षात घेण्याजोगे आहे.

सरतेशेवटी ...

हे पुस्तक वाचून पूर्ण करताना मनात येत असलेला पहिला मुद्दा म्हणजे, आपल्या देशाच्या इतिहासात १८५७ या एका वर्षाला किती अर्थाने महत्त्व आहे !

जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सची निर्मिती १८५७ सालाची...

मुंबई विद्यापीठाची स्थापना १८५७ सालची .,..

मुंबई शेअरबाजारात पहिल्यांदा उलाढालींना चालना मिळाले असे वर्ष म्हणजे १८५७.

आणि

आपल्या देशाचं पहिले स्वातंत्र्ययुद्ध १८५७ साली!

आणि दुसरा असाच मुद्दा ....

या पुस्तकाचा मुख्य धागा असणारा 'स्त्री चित्रकार' हा मुद्दा, त्यांचे त्या काळातील कार्य, त्याचे महत्त्व, अगदी आजच्या काळातही पटवून देणारा अनुभव गेल्या महिन्याभरात मी माझ्याच घरी, अक्षरशः बसल्या बसल्या घेतला. साधना बहुलकर मॅडमचे हे पुस्तक आणि सुहास बहुलकर सरांची ३ पुस्तके माझ्या घरी अगदी समोर दिसतील अशी ठेवली होती. ही पुस्तके माझ्या घरी आल्यापासून निदान २५-३० जण तरी (त्यापैकी निम्म्या तरी स्त्रिया) 'चित्रकला - शिल्पकला' या विषयाचे एकेकाळी विद्यार्थी असणारे येऊन गेले. त्यातल्या कोणालाही त्यांचा विषय म्हणूनसुद्धा आपणहून ही पुस्तके हातात घेऊन पाहावी असे वाटले नाही! मीच चहापाणी करण्याआधी त्यांच्यासमोर ही ठेवली. काळाच्या ओघात हा विषय एकतर व्यवसाय झाला आहे किंवा आता जगण्याच्या चढाओढीत यापासून संपर्क तुटला आहे अशी त्यावेळी अनेकांची भावना होती. हे इथे लिहायचे कारण म्हणजे 'जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्च्या सुरुवातीपासूनच अनेक विद्यार्थिनींचा नंतरच्या काळात कला क्षेत्राशी संबंध राहिलेला नाही' असा उल्लेख या पुस्तकात आला आहे.

एकंदरीतच, 'मराठीच्या पेपरमधे ज्ञानेश्वर हा ४ मार्कांचा मुद्दा आहे' अशातलं समीकरण !

तसेच, एकंदरीतच या क्षेत्राविषयीच्या नोंदी वेळच्यावेळी करणे आणि अशा नोंदी जतन करणे हा आपल्या देशात अक्षम्य हेळसांड करण्याचा व केल्याचा विषय आहे असा !

त्यामुळे त्या काळात या स्त्री चित्रकारांनी केलेले काम इतक्या सविस्तर, सखोल, सुसंगत, सुगम पद्धतीने मांडल्याबद्दल साधना बहुलकर मॅडम खचितच अभिनंदनास पात्र आहेत.

हॅट्स ऑफ टू यू साधना बहुलकर मॅडम !

**- चन्द्रशेखर टिळक**

सी-४०२, राज पार्क, मढवी बंगल्याजवळ,
राजाजी पथ, डोंबिवली (पूर्व), पिन - ४२१२०१
भ्रमणध्वनी - ९८२०२९२३७६

●●●

# उंटांची अद्भूत रम्य दुनिया
# २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष

*प्रस्तुत लेखाच्या शीर्षकावरून 'उंट' या प्रजातीची माहिती वाचण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण नक्कीच झाली असेल! वाचा तर... - संपादक*

**Crisis - Chapter 12**

LPPS साठी २००१ च्या शेवट पर्यंत सर्वगोष्टी सुरळीत चालू होत्या. त्यांची ही छोटीशी संस्था बऱ्यापैकी स्थापन झाली होती व अर्धा डझन पूर्णवेळ व अर्ध्या वेळासाठी कर्मचारी ठेवले होते. ट्रेनिंग सेंटर सुरू केल्यावर त्यांनी त्यांचे ऑफीस बुटीबागमध्ये हलविले. जी जागा त्यांनी १९९७ घेतली होती. ही जागा मुख्यतः एक गव्हाचे शेत होती. ती साद्री गावापासून पांच कि.मी. दूर होती व कुभांलगड अभयारण्यापासून जवळ होती. बुटीबाग आता सर्व कामांचे केन्द्रस्थान होते. रायका किंवा इतर जनावरांचे पालक दिवसा किंवा रात्री कधीही त्यांचा उंट आजारी असेल तर किंवा इतर काही समस्या असेल तर किंवा फक्त मित्रत्वाने भेटायला येत. कधीकधी ते त्यांच्या कुटुंबातील लोकांना सर्व सुविधा, संगणक, प्लास्टिक जार मध्ये ठेवलेल्या पारंपरिक औषधातील साहित्य, छोटे वाचनालय, अनेक फाईल्सच्या रांगा व त्यांच्या विविध कामांच्या फोटोंचे अल्बम दाखवण्यासाठी येताना घेऊन येत.

या सर्व भेटायला येणाऱ्या लोकांमध्ये सरकारी व बिनसरकारी संस्थांमधील लोक, तसेच विदेशी पाहुणेही असत. ते अनेक विद्यार्थ्यांचेही आदरातिथ्य करीत, जे प्रत्यक्ष जागेवर संशोधन करायला येत असत. काही वेळेस ते अतिशय उपयुक्त काम करत.

त्यापैकी एक डर्क फ्लोटर होता. त्याने काळजीपूर्वक त्यांच्याकडे नोंदणी केलेल्या ऐंशी कुटुंबातील उंटांचे सर्वेक्षण केले व सांगितले की, उंटांची संख्या स्थिर आहे. त्यांनी त्यांचे काम फक्त उंटांवर केन्द्रित न ठेवता सर्वसाधारणपणे सर्व पाळीव जनावरांकडे वळवले. रायकांच्या सांगण्यावरून ते मेंढ्यांसाठी प्रकल्प तयार करत होतो. रायकांकडे उंटापेक्षा जास्त प्रमाणांत मेंढ्या होत्या. म्हणून त्यांच्या समुदायांतील जास्त लोकांना त्याचा फायदा झाला असता. मेंढीपालही अतिशय तणावग्रस्त होते. लोकरीच्या किंमती अभूतपूर्व खालावल्या होत्या. आजकाल लोक सिंथेटीक कपड्यांचा जास्त वापर करू लागले होते. मेंढपाळांनाही चरण्याची समस्या होतीच. उंटपाळांप्रमाणे कुंभालगड अभयारण्यातील निर्बंधांमुळे त्यांच्यावरही वाईट परिणाम झाला होता.

इल्सने रायका व त्यांच्या मूलभूत ज्ञानाविषयी मोठ्या प्रमाणात लिहिलेले असते. त्यामुळे ते अनेक भागांत माहीत झालेले असतात.

LPPS, LIFE, (local life Stock for Empowerment of Rural people) यांच्या बरोबरही काम करत होते. पाश्चिमात्य पद्धतीने खूप उत्पादनांवर भर देण्याऐवजी पशुंची पैदास स्थानिक ज्ञानाच्या व साधनांच्या मदतीने करण्यावर भर होता. ज्यायोगे सामाजिक व पर्यावर्णीय दृष्ट्या शाश्वत, आर्थिक परतावा सुधारणे हा ग्रामीण विकासाचा व गरिबी निर्मूलनाचा विकसनशील देशांत महत्त्वाचा मुद्दा आहे. बहुतेक मदत करणाऱ्या संस्थांनी व सरकारने भरपूर दूध देणाऱ्या फ्रेजियन गाई आणण्यावर भर दिला. मुख्यतः काळी व पांढरी फ्रेजियन जनावरे. पण ही पद्धत अपयशी ठरली. कारण

त्यांचे खाणे व पशु वैद्यकीय काळजी यांची या पशूंना वाढविण्यात मोठी गरज होती व दुसरा महत्त्वाचा तोटा म्हणजे जैवविविधतेची हानी किंवा संहार.

स्थानिक जनावरांमधील विविधतेचा नाश 'भविष्यातील अन्न सुरक्षितता' हा युनायटेड नेशन्स या जागतिक संघटनेचा अन्न व शेतकी संस्थेचा महत्त्वाचा काळजीचा मुद्दा होता. ते स्थानिक सरकारांना या विषयी जागृत करायचा प्रयत्न करत होते व त्यांच्या स्थानिक जाती व प्रजातींचे संवर्धन करण्यास प्रोत्साहन देत होते. पशुधनासंबंधी नवीन दृष्टीकोन ठेवायची तातडीने आवश्यकता होती, ज्याची गरज फक्त जास्तीत जास्त उत्पादनासाठी, नाहीतर सामाजिक व पर्यावरणाच्या परिणामाच्या दृष्टीने महत्त्वाची होती.

इल्स सतत फिरतीवर होती. त्यामुळे ती फार थोडा वेळ साद्रीत असे. आता उंट हेच त्यांचे सर्वस्वी ध्येय व चिंता नव्हती, पण त्यांनी ट्रायपानोसोमियासिस प्रोफिलॅकस्सिस व मॅनगेवर उपचारही कमी किंमतीत उपलब्ध केले होते. जेव्हा जेव्हा उंट आजारी असल्याचे समजत असे तेव्हा तेव्हा LPPS चा स्टाफ मदत करत असे.

नोव्हेंबरमध्ये परत 'पुष्कर मेळा' भरला. सलग दहाव्यांदा तिने हजेरी लावली. हे नेहमीचेच झाले होते.

हणमंत व ती प्रोजेक्ट बाईकवर दोनशे कि. मीटर गेले. तिला आता बोचणारी थंडी व कडक उन्हाळा या हवामानाची सवय झालेली असते. पहिले पन्नास कि.मी. एवढी थंडी असते की, रक्ताभिसरण कायम ठेवण्यासाठी प्रत्येक चहाच्या स्टॉलवर थांबतात. नंतर काही वेळ त्यांची शरीरे बाहेरील हवामानांशी समतोल राहतात. सूर्य तळपत होता व त्याबरोबर कोरडा वारा वाहत होता. ते त्यांच्या नेहमीच्या गेस्ट हाउसमध्ये उतरतात.

ते पहिल्यांदा 'अंजी की धानी' व गोदवारच्या रायकांचे तंबू असतात तिथे जातात. अडोजी, गौतमजी, हरजिराम आणि नेहमीचे सर्वजण जिथे असतात तिथे जातात. ते वाकळ पसरतात व दोन तरटाच्या गोणीच्या उशा करतात व त्यांना आराम करायला सांगतात. कोणीतरी एकजण तिला उंटाच्या दुधाचा वाफाळलेला चहा व कणसाची भाकरी आणून देतो. बहुतेक जनावरे रात्री चरण्यासाठी बाहेर नेलेली होती. सर्वकाही नेहमीप्रमाणे वाटले. हणमंतने 'मेळा कसा आहे ?' विचारल्यावर त्याला उत्तर मिळते, 'ठीक आहे. खास नाही.' तिला कोणीतरी येऊन सांगते की, बगदीराम तिला शोधत होता. बगदीराम हा चितोडगडच्या रायकांचा नेता असतो. तो शिकलेला होता व नेहमी त्यांच्या कार्यशाळेत व कार्यक्रमांत भाग घेत असे. तो रायकांच्या देवळात उतरलेला असतो. हॉटेलमध्ये झोपायला जाण्यापूर्वी ते त्याला भेटायला जातात. ते मारू रायकांचे देऊळ होते व तेथे गोदवारच्या रायकांना प्रवेश नव्हता व परदेशी पाहुण्यांनाही प्रवेश नव्हता. बगदीराम बाहेर आला. त्याच्या हिरव्या फेट्या वरून तो मेवाडचा आहे हे त्यांनी लगेचच ओळखले. तो नेहमी एक छोटी बॅग जवळ ठेवत असे. त्यामध्ये तो महत्त्वाची कागदपत्रे ठेवत असे. उदा. उंटांच्या दूध विक्रीचा अहवाल. खुशालीची देवाण-घेवाण केल्यावर त्याने बातमी सांगितली.

तो म्हणाला, 'की त्याला अतिशय काळजी वाटते की, तो बोलत असतानाही शेकडो उंट जुन्या पुष्करमध्ये गोळा करत आहेत व ते खाटीक व मध्यस्थ विकत घेत आहेत ते त्यांना वेस्ट बंगाल व उत्तरप्रदेश खाटीकखान्यात नेतील'. तिने व हणमंतने एकमेकांकडे पाहिले. गेल्या वर्षी त्यांनी या अफवा अस्पष्टपणे ऐकल्या होत्या की, 'सर्व उंट कामासाठी विकले जात नाहीत, तर काही मांस बाजारात जातात.' पण कोणीच नक्की काही सांगत नव्हते.. तिच्या रिसर्चच्या सुरवातीला तिला मिळालेली तीव्र प्रतिक्रिया ती विसरू शकत नव्हती. तिच्यामते जे उंट कामासाठी अयोग्य होते त्यांची कत्तल झाली तरी हरकत नव्हती.

पण बगदीराम सांगतो की, 'चांगले ताकदवान उंट भरपूर मांस असलेले व माद्याही मारल्या जात होत्या.' बगदीराम म्हणतो, 'की हे रायका संस्कृतीच्या विरुद्ध आहे. हे थांबविण्यासाठी मला तुमची मदत हवी आहे. उंटांचे कळप आधीच कमी होत आहेत. जर तरुण मादी उंट कत्तलखान्यात पाठवले तर त्याचे परिणाम विनाशकारी असतील. प्रजोत्पादन करणारे कळप कमी होतील व एखादा दुष्काळ किंवा रोगच्या साथीने त्यांची संख्या खूप कमी होईल.', हणमंत त्याच्याशी सहमत होतो. बगदीरामला अजमेरच्या कलेक्टरला पत्र लिहायचे असते की, 'पुष्कर एक पवित्र स्थान आहे. हे इथे होता कामा नये. गाई गुरांना इथल्या प्रांतांतून न्यायला बंदी आहे. मग उंटाना दुसऱ्या प्रांतांत नेण्यास का बंदी नाही' हे पत्र जिल्हाधिकारी व इतर संबंधित संस्थांना पाठवायचे असते. तसेच वर्तमानपत्राकडेही पाठवायचे असते. तसेच दुसऱ्या दिवशी त्याने मोठी सभा बोलावलेली असते, त्या सभेला तो इल्सला हजर राहायला सांगतो. दुसऱ्या दिवशी मीटिंग संध्याकाळी सात वाजता असते, पण वेगवेगळ्या भागांतील रायका गटागटाने येत राहतात. त्यांच्या फेट्यांच्या रंगावरून ते राजस्थानातील कोणत्या भागांतून आले आहेत हे समजते. इल्स व हणमंत काही शिकलेल्या रायकांमध्ये पुढे बसतात. सभेला त्यांच्या देवळाच्या गुरुजींच्या आशीर्वादाने सुरवात होते. अनेकांची भाषणे होतात. शिकलेले रायका त्यांच्या कपड्यांवरून ओळखायला येतात. त्यांनी धोतर व फेटा घातलेला नसतो. बहुतेक वेळा ते रायकांना 'जनावरे पाळणे सोडून द्या व तुमच्या मुलांना शिकवा' असे सांगतात. नंतर बगदीराम बोलायला सुरवात करतो. तो आधी इतर मुद्यांवर बोलतो व मग उंटांच्या होणाऱ्या कत्तलीच्या मुद्याविषयी बोलतो. त्यांच्या समाजावर टीका करून कडक भाषा वापरण्याऐवजी तो त्यांना उंट मांसासाठी विकण्यापासून दूर राहायला सांगतो व जिल्हा अधिकाऱ्याला त्याने लिहिलेल्या पत्रावर सही करायला सांगतो व ते पत्र सहीसाठी किंवा अंगठ्याच्या ठशासाठी सभेत फिरवतो. त्या नंतर हणमंत त्याचे अतिशय उत्कृष्ट भाषण करतो. ते रायकांना त्यांच्यामध्ये 'एकी ठेवायला व उंटांचं रक्षण करायला' सांगतो.

दुसऱ्या दिवशी बगदीराम त्या पत्राची प्रत जिल्हा अधिकाऱ्याला देतो. आज शनिवार, २५ नोव्हेंबर २००१ पुष्कर येथील राम रायका मंदिरात ऑल-इंडिया रायका निमल हर्डर्स असोसिएशन, - आमचा समुदायाने बैठकीत पुढील निर्णय घेतला.

१) आमच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन प्राणी पाळणे आहे. म्हणून आम्ही मादी उंटांचे रक्षण करणे आवश्यक आहे. आम्ही सर्वांनी ते विकले तर आमचे जीवनच संपेल. म्हणून आमच्या समाजाने फर्मान काढले आहे की, मादी उंट कत्तल करणाऱ्यांना विकल्या जाऊ नयेत. त्या फक्त इतर प्राणी पाळणाऱ्या समुदायांना जे प्राण्यांना आपली लेकरे समजतात त्यांना विकल्या जाऊ शकतात.

२) या पुष्कर मेळ्यात मादी उंट कत्तल करणाऱ्यांकडून विकत घेऊन, परदेशी कत्तलखान्यात नेले जात आहेत. त्यामुळे मादी उंटांची संख्या खूपच कमी झाली आहे.

३) जिल्हाधिकाऱ्यांना एक पत्र लिहायचे आहे, ज्यात त्यांना तंबू उभे करून मादी उंटांना मारून रात्रीच्या वेळी पळवून नेणाऱ्यांवर कारवाई करण्याची विनंती केली आहे.

४) कारवाई न झाल्यास आमचा समुदाय निदर्शने करेल.

या पत्राने पुरावा दिला आणि पुन्हा एकदा त्यांच्या स्वत:च्या शब्दांत अधोरेखित केले की, रायकाने केवळ उपजीविकेसाठी प्राणी पाळले नाही, तर ही त्यांची ओळख होती, ज्याशिवाय ते रायका नाहीतर, दुसरे कोणीतरी होतील. प्राणी हे आपल्या मुलांसारखे असतात. या वाक्प्रचारापेक्षा अधिक चांगल्या प्रकारे भावना व्यक्त होणार नाहीत.

या पत्राने तिला दहा वर्षांपूर्वी ती रायकांकडे का

आकर्षित झाली याची आठवण करून दिली. एका अर्थाने याने तिला खूप आनंद झाला की, हा एक पुरावा होता की, प्राण्यांवर आर्थिक दृष्ट्या अवलंबून राहणे शक्य आहे व त्यांना यंत्राच्या दर्जाला व उत्पादनाचे साधन न समजता व त्यांच्या कल्याण्यासाठी व त्यांच्या हितासाठी जबाबदार समजतात.

आजकाल रोजच्या खडतर व गोंधळाच्या रोजच्या दिनचर्येत तिला शेतात जाण्याची, उंटांचे कळप पाळणाऱ्यांशी बोलण्याची आणि शांत वातावरणाचा आनंद घेण्याची क्वचितच संधी मिळते. पण ते आणखी काय करू शकत होते? त्या दोघांची दिनचर्या अतिशय व्यस्त होती. हणमंतला साद्रीमध्ये अनेक कामे असतात व ती थोड्या दिवसांतच जर्मनीला जाणार असते. ते पटकन सर्व अधिकाऱ्यांना जे या मुद्याशी संबंधित असतात त्यांना पत्र पाठवतात व त्याला रायकांचे पत्र जोडतात व अहवालही जोडतात.

'उंट एक धोक्यात आलेली पशुधन प्रजाती.'

ती दोन महिन्यांनी भारतात परत येते तोपर्यंत एकही उत्तर आलेले नसते. सहा महिन्यांनी पहिल्यांदा एक उत्तर येते.

२४ मे २००२
राजस्थान सरकार,
प्राणी संचालनालय,
जयपूर
पत्र क्र. FV 2030

To,
हणवंतसिंग राठोड
LPPS,
Ambedkar Nagar, Safari

संदर्भ : पत्र, मंत्री महोदय पशुपालन व्यवसाय.

विषय : मादी उंटांच्या कत्तलीवर कारवाई

प्रिय महोदय,

आम्ही या विषयी माहिती गोळा केली. अजमेर येथील पशुसंवर्धन विभागाच्या उपसंचालकांच्या मते, २००१ मध्ये पुष्कर मेळ्यात ५३८१ उंटांची विक्री झाली होती. कोणीही प्राणी वेस्ट बंगालमध्ये नेलेले नाहीत. त्याचप्रमाणे कोणत्याही प्राणी कळप पालकाने मेळा अधिकाऱ्याला या विषयी तक्रार केली नाही. पण अशी गोष्ट लक्षांत आली तर राजस्थान सरकार या विरुद्ध आदेश देईल.

सरकारचे उंटांच्या आजारांवर नियंत्रणासाठी उदा. ट्रायपॅनोसोमियासिस, मांगे आणि हिमरेजिक सेप्टिसीमिया इत्यादी आजारांवर कार्यक्रम आहेत. साथीचा आजार असल्यास 'जिल्हा रोग नियंत्रण केंद्रे' सेवा देतात.

रोग नियंत्रणासाठी विभागातर्फे शिबिरेही आयोजित केली जातात. पारंपरिक उंट प्रजनन क्षेत्र आरक्षित करणे ही चांगली कल्पना आहे.

प्रशिक्षण आणि उंटाच्या दुधाच्या विक्रीबाबत सरकारला सहकार्य करण्याच्या तुमच्या सूचनेचे स्वागत करतो. राज्याचे क्षेत्रफळ ३,४२,००० चौरस किमी असून, त्यापैकी २५% वाळवंट आहे. या भागात जैसलमेरी, बिकानेरी आणि मारवाडी उंटांच्या जाती आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागात उंट वाहतूक आणि शेतीसाठी मोठे काम करतात.

या पत्राचा सारांश असा होता की, पशू संवर्धनाच्या मुख्य संचालकाला उंट पश्चिम बंगालमध्ये कत्तल करण्यासाठी जातात या विषयी शंका होती. लोकांची कशी खात्री पटवायची हे त्यांना समजत नव्हते.

हे अतिशय उपरोधिक होते की, त्यांना रायकांना मदत करण्याबद्दल आंतराष्ट्रीय मान्यता मिळत होती,

त्यांना राजस्थानातील उंट संस्कृती जपण्यासाठी प्रतिष्ठित पुरस्कार, रोलेक्स घड्याळ व काही रोख रक्कमेसहित हे कारण पुढे नेण्यासाठी देण्यात आला. त्यांचा हम्बुर्गमध्ये अँग्लो इंडियन क्लबमध्ये पार्टीत सत्कार करण्यात आला. ख्यातनाम पत्रकारांनाही बोलावण्यांत येते. त्यामुळे त्यांना भरपूर प्रसिद्धी मिळते व ते जर्मनीच्या T.V. वर येतात.

तसेच, प्राणी आनुवांशिक संसाधनाचे संवर्धन हा चर्चेचा विषय झाला होता. जून २००२ मध्ये, जागतिक अन्न शिखर परिषदेने रोममधील अन्न आणि कृषी संघटना (FAO) आणि त्याच्या सिव्हिल सोसायटी फोरममध्ये हणमंतने मोठ्या प्रेक्षक वर्गासमोर एक सादरीकरण केले. घरगुती पशुधन जातींचे व्यवस्थापक म्हणून रायकांच्या भूमिकेवर आणि कार्यपद्धतींवर अशाच धर्तीवर विचार करणाऱ्या इतर अनेक स्वयंसेवी संस्था उपस्थित होत्या व प्राण्यांच्या आनुवांशिक संसाधनांवरील आंतरराष्ट्रीय करारावर वाटाघाटी करण्यात याव्यात हा निर्णय घेण्यात आला.

शेवटी, कत्तलीसाठी उंट पश्चिम बंगालच्या पलीकडेही नेले जात असल्याचा पुरावा वर्षभरात एका अनपेक्षित ठिकाणाहून आला. ती फेब्रुवारी २००३ मध्ये, बांगलादेशात स्वयंसेवकांना देशी जनावरांच्या जातीचे संवर्धन करण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी गेली होती. संचालक, सुकांता सेन यांनी तिच्या उंटाच्या स्वारस्याबद्दल ऐकले होते.

बांगलादेशात विकल्या गेलेल्या राजस्थानमधील उंटांच्या फोटोंसह वृत्तपत्र कात्रणांचा संकलन केलेला जाडजूड कागदपत्रांचा संच तिला दिला. बकरी- ईदच्या प्रसंगी - ज्यामध्ये बकरी किंवा इतर जनावरांचा बळी देण्याची प्रथा आहे. उंट बांगलादेशात नवीन असल्यामुळे त्यांनी खळबळ उडवून दिली होती.

२८ फेब्रुवारी २००३ रोजी बिनान एअरवेजच्या ढाका ते कोलकाता परतीच्या प्रवासात, कागदपत्रे चाळत असतांना तिला विमान कर्मचाऱ्याने ढाक्याचे मुख्य इंग्रजी वृत्तपत्र, 'डेली स्टार'ची प्रत वाचायला दिली. त्यातील एका मुख्य बातमीने तिचे लक्ष वेधले, -

'उंट तस्करांसह सीमेवरील घटना.'

'बीडीआर, बीएसएफ यांचे उंट तस्करांवर गोळीबार.'

काल सकाळी बांगलादेश व भारतीय सीमा सैनिकांनी उंटांची तस्करी करणाऱ्यांनी शिबगंज येथे उंट आणायचा प्रयत्न केल्यावर एकमेकांवर जवळजवळ पाच तास जोरदार गोळीबार केला.

आता त्यांना छापील (in black and white) जोरदार पुरावा मिळाला होता. या नवीन पुराव्याचे फोटो त्यांनी अर्धा डझन मासिकांना व वर्तमानपत्रांना पाठवले. एकही प्रतिक्रिया आली नाही.

२००३ चे वर्ष खूपच धावपळीचे होते. तिला व हणमंतला त्या वर्षी पुष्कर मेळ्याला जाता आले नाही. आंतराष्ट्रीय स्थरावर अनेक मुद्यांना भरपूर चालना मिळाली होती व ते त्या कामात व्यस्त होते. विशेषतः सर्व पशुपालकांना जागतिक स्थरावर एकत्र आणण्याचे प्रयत्न चालू होते. मंगोलियन प्रजननकर्ते, इराणचे मेंढपाळ पेरूचे लामापालक, टांझानियातून व केनियातून मसाई, जॉर्डन मधून बदाऊनी व इतर अनेक पारंपरिक संस्कृतीचे पशुपालक दरबान जागतिक उद्यान परिषदेच्या, साउथ आफ्रिका येथे जमलेल्या मेळाव्याच्या बाजूला भेटले.

स्वत: LPPS ने साद्री येथे प्राणी-आनुवांशिक संसाधनांच्या समुदाय आधारित व्यवस्थापनावर आशियाई स्तरावरील परिषदेचे आयोजन केले होते; ज्यात चीन, नेपाळ, बांगलादेश, पाकिस्तान, श्रीलंका, व्हिएतनाम, लाओस आणि फिलीपिन्स या देशांतील सरकारी अधिकारी आणि संशोधक सहभागी झाले होते. भारतातून

एकही सरकारी प्रतिनिधी नव्हता. त्यांच्या मर्यादित पायाभूत सुविधा पाहता, खूप सुखसाईंची सवय असलेल्या आणि क्वचितच ग्रामीण भागांत जाणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांचा एवढा मोठा मेळावा आयोजित करणे हे एक मोठे आव्हान होते. पण ते उत्तमप्रकारे पार पडले आणि अनेक धारणा बदलल्या. सरकारी प्रतिनिधींसोबत त्यांनी सद्भावना निर्माण केली होती. या सभेनंतर आणखी मोठी सभा LPP ने केनियात भरवली.

रमेश या त्यांचा नेहमीचा क्षेत्र सहाय्यक पुष्कर जत्रेला रायकांबरोबर गेला. त्याचा अहवाल चिंताजनक होता. पूर्वीच्या काळात, कत्तलीसाठी उंटांची खरेदी ही एक चोरून केलेली गोष्ट होती, ज्याची कोणीही उघडपणे कबुली देत नव्हते. आता संपूर्ण वातावरण बदलले होते. पूर्वी छुप्या पद्धतीने काम करणाऱ्या व्यापाऱ्यांनी आता अनेक मोठे तंबू उभारले होते व ते उघडपणे आपला व्यवसाय करत होते.

रमेशच्या अहवालानुसार, यामध्ये २,०००–३००० उंटांची विक्री होत होती. किंमतींमध्ये लक्षणीय वाढ झाली होती जी रायकासाठी चांगली होती. पण अर्थातच, ज्यांना काम करणाऱ्या उंटाची गरज होती अशा गरीब ग्राहकांसाठी ते योग्य नव्हते. पश्चिम बंगालमधील व्यापारी उंट पाळणाऱ्यांना टोमणे मारत होते की, पुढील पाच वर्षांत ते राजस्थानचे संपूर्ण उंट संपवतील. जत्रेत व्यापार इतका जोरात होता की, पहिल्या दोन दिवसांतच सर्व उंट विकले गेले. परिणामी, उंट पटकन निघून गेले आणि हजारो आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी हा कार्यक्रम अयशस्वी ठरला. ज्यांना जत्रेच्या शेवटच्या दिवसांत आकर्षित केले जाते. राजस्थान पर्यटन विभागाने हा एक प्रमुख कार्यक्रम म्हणून प्रचार केला होता.

त्यांनी २००४ ला उंटांच्या वर्षा मध्ये बदलण्यासाठी अनेक उपक्रम आयोजित करून नवीन वर्षाचा संकल्प केला होता, ज्यामुळे आशा होती की, समस्येकडे लक्ष वेधले जाईल. त्यापैकी एक म्हणजे, साद्री येथे जगभरातील तज्ज्ञांसह 'आंतरराष्ट्रीय उंट परिषद' आयोजित करणे. दुसरे म्हणजे, राजस्थानमधील त्यांच्या भागातील उंटांचे पुनर्सर्वेक्षण झाल्याने त्यांच्याकडे विश्वसनीय माहिती असेल. सरकारी आकडेवारीपेक्षा, उंटांच्या त्यांच्या १९९५ च्या पहिल्या कामातून हे आकडे त्यांना आधार म्हणून सध्याच्या उंटांची संख्या तुलना करायला उपयोगी पडेल. त्याचा घरगुती सर्वेक्षणातून IPPS च्या कर्मचाऱ्यांनी कष्टांनी केलेल्या सर्वेक्षणाच्या निकालाने त्यांना धक्का बसला. गेल्या नऊ वर्षांत ५०% टक्के उंट कमी झाले होते. ही तीव्र कपात तीन कारणांमुळे होती. चराऊ जमीनीची कमतरता, रोगराई व उत्पन्नांचा अभाव.

हा कल साहजिकच रायका कुटुंबांच्या उपजीविकेत एक वेगळा बदल दाखविणारा होता. ते स्वतंत्र ग्रामीण उत्पादक असल्याने, ज्यांनी पूर्वी त्यांचे उत्पन्न पशुपालनातून मिळवले होते ते शहरांमध्ये रोजगार मिळवणारे मजूर बनले होते. मिठाईच्या दुकानांत, ढाब्यांमध्ये किंवा बांधकामांत त्यांनी ज्या परिस्थितीत काम केले, ते अनेकदा भयानक होते, असे काम करणाऱ्या मुलांच्या पालकांनी सांगितले, 'कामाचे जास्त तास, सकाळी पाच वाजल्यापासून मध्यरात्रीपर्यंत; झोपायला जागा नाही; स्वच्छतेचा अभाव आणि पिण्याचे दूषित पाणी' यामुळे ते वारंवार आजारी पडत होते.

पण या बदलामुळे राष्ट्रीय दृष्टीकोनावरही परिणाम झाला. तेरा वर्षांपूर्वी, जेव्हा ती पहिल्यांदा भारतात आली तेव्हा देशाला जगातील तिसऱ्या क्रमांकाची उंट लोकसंख्या असल्याचा अभिमान वाटत होता. आता ते पाकिस्तानपेक्षा खूप मागे पडले होते – कुठेतरी जगात आठव्या किंवा नऊ क्रमांकावर होते.

त्यांच्यासाठी ही ग्रामीण भागांतील आर्थिक

विकासाची गमावलेली संधी होती, जी तरुणांना शहरांमध्ये स्थलांतरित होण्यापासून आणि झोपडपट्ट्यांमध्ये जाण्यापासून रोखू शकत होती.

याच वेळी जगाच्या विविध भागांतील रोमांचक कथा समोर आल्या, जिथे सरकारच्या भक्कम पाठिंब्याने उंटांना प्रोत्साहन दिले जात होते. दुबईमध्ये उंटांच्या दुधाची जाहिरात 'वाळवंटातील पांढरे सोने' म्हणून करण्यात आली होती आणि त्याच्या आरोग्य-वर्धक गुणांबद्दल नवीन आणि आश्चर्यचकित करणारी तथ्ये तपासली जात होती. अमिरातीमध्ये उंटांचे दूध स्वयंचलित यंत्राद्वारे काढले जात होते व भरपूर ऊर्जा देणारी दुभती जनावरे म्हणून त्यांचे वैशिष्ट्य दाखवले होते व आणि गोशाळेच्या गायींच्याप्रमाणे त्यांना वातानुकूल यंत्राची गरज नव्हती. ते जर्मन शास्त्रज्ञ डॉ. वारनेरी यांच्या मार्गदर्शनाखाली व देशाच्या राज्यकर्त्यांच्या आर्थिक सहाय्याने काम करत होते.

ओमानच्या सल्तनतने उंट व्यवहार विभागाची स्थापना केली होती, ज्याचे प्रमुख सुदानमधील तिचे जुने स्नेही प्रोफेसर बकरी मुसा होते. मध्य आशियामध्येही उंटांचा दुग्धव्यवसाय विकसित करण्याचे प्रयत्न सुरू होते व 'उंटांचा वाळवंटीकरणाचे निराकरण करण्यासाठी उपयोग' यावर परिषद होती. आणि फिल्ड ट्रिप दरम्यान त्यांना दाखवण्यात आले होते की, जेव्हा प्रवासी थांबत होते तेव्हा दूध देण्यासाठी मादी उंटांना महामार्गालगत भोजनालयांमध्ये ठेवले होते. या परिषदेत ती उत्साही नॅन्सी अबेदर रहमाने यांना भेटली, जिने प्रत्यक्षात उंट डेअरी सुरू केली होती आणि मॉरिटानिया या तिचे वास्तव्य असलेल्या देशात एक यशस्वी कंपनी स्थापन केली होती. तिची टिविस्की डेअरी अतिशय चांगली चालत होती आणि तिने उंट डेअरी उत्पादनांचे अनेक प्रकार तयार केले होते, ज्यात कॅमेलबर्ट नावाच्या पाककृतीचा समावेश होता.

वर्षाच्या शेवटी ती व हणमंत, मंगोलियन नॅशनल युनिव्हर्सिटीमध्ये आयोजित, 'जागतिकीकरणाच्या जगात भटक्यांची सद्य परिस्थिती आणि दृष्टीकोन' या विषयावरील परिषदेसाठी मंगोलियाला गेली. गोबीच्या वाळवंटात अनेक वर्षांपासून उंट भटक्यांसोबत काम करणारी तिची मैत्रीण सबिन श्मिड हिने त्यांना भेटायला बोलावले.

मंगोलियन एअरवेजच्या छोट्या विमानातून ते वाळवंटाच्या मध्यभागी एका एकाकी (उपेक्षित) हवाई पट्टीवर उतरतात. लाल आणि खडबडीत वाळवंटाच्या पट्टीतून मार्ग काढत उंट-प्रजनन करणाऱ्या अनेक भटक्या कुटुंबांमध्ये येतात. येथे मुख्यत: महिला कारभारी होत्या, तर त्यांचे पती क्वचितच दिसत होते. महिलांनी दुधाच्या दोन कुबड्या असलेल्या बॅक्ट्रियन उंटांचे दूध काढले आणि दुधावर प्रक्रिया करून अनंत प्रकारची उत्पादने तयार केली, ज्यामध्ये कडक आणि खारट चीजचा समावेश होता. त्यांनी दूध आंबवून त्यांना उंटाची वोडकादेखील दिली. त्या उद्योगी बायकांनी उंटांच्या दुधापासून खास पदार्थ, टॉफी तयार केली.

त्या बॅक्टेरिअन उंटांच्या लांब व चमकदार केसांपासून, हातमोजे, मफलर व टोप्या तयार करून त्या पर्यावरणाला अनुकूल पर्यटनाच्या प्रकल्पाद्वारे पर्यटकांना विकत असत. शाळेत जाणाऱ्या मुलीसुद्धा खेळण्यातील उंट बनवत. ऊर्जेचे एक स्रोत म्हणून जे धुररहित व चांगले जळणारे उंटांचे शेणही खूप उपयुक्त होते. पण राजकीय घडामोडीनंतर कम्युनिस्ट राजवटीतून बाजार अर्थव्यवस्थेत झालेल्या बदलामुळे उंटांची संख्या खूप कमी होती.

इतर देशांच्या अनुभवांवरून असे म्हणता येईल की, भारतात, ऐतिहासिक दृष्टीने वाहतुकीसाठी विकसित झालेली उंटांची संकल्पना अतिशय मर्यादित होती व ती व्यापक करणे आवश्यक होते.

---

उंटाचे अस्तित्व टिकवण्यासाठी विविध आर्थिक प्रोत्साहने निर्माण करावी लागली. भारतीय, विशेषत: राजस्थानी, धोरणकर्त्यांना स्थानिक उंटांच्या संख्येमध्ये असलेल्या प्रचंड क्षमतेची जाणीव करून देण्यासाठी त्यांना काही सांस्कृतिक क्रॉस-फर्टिलायझेशनची आवश्यकता होती. त्यांना आशा होती की, ते इतर देशांतील तज्ज्ञांसोबत जी आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करत आहेत ती महत्त्वाची भूमिका बजावेल.

परंतु, केवळ वरपासूनच काम न करता, खालूनही काम करणे आणि केवळ साद्रीतील आपल्या लहानशा विश्वातच नव्हे, तर राजस्थानमध्ये त्याबद्दल एकत्र येणे आणि जागरुकता वाढवणे आवश्यक होते. त्यांच्या निष्ठावंत रायकांनी, बागदीराम आणि भोपालाराम, यांच्या मदतीने त्यांनी राज्यभरातून फ्रंट प्रजनन कर्त्यांशी संपर्क साधला आणि त्यांना आमंत्रित केले.

तिच्या पहिल्या संशोधनातून तिला हे माहीत होते की, अचला हे देविकोटजवळ जैसलमेरजवळ उंटांसाठी प्रसिद्ध आहे, म्हणून त्यांनी ते उंट पालकांच्या नेटवर्कमध्ये प्रवेशाचे ठिकाण म्हणून वापरले, गावांमध्ये मीटिंगला जास्तीत जास्त लोकांना आमंत्रित केले. त्यांनी पैसे देऊ केले असले तरी, अनेक उंट पाळणारे हे आमंत्रण स्वीकारण्यास नाखूष होते, कारण ते निरक्षर होते व आणि बसवरची चिन्हे वाचू शकत नव्हते. त्यांना हरवून जायची भीती होती.

शेवटी, जैसलमेरमधील राजपूत, बारमेरमधील बिश्नोई, बिकानेरमधील जाट, नागौरमधील गुज्जर आणि सिंधी मुस्लिमांचा समावेश असलेल्या विविध जातींच्या सदस्यांचा समावेश होता. हणवंतच्या मूळ गावातील वनवागरी समाजातील एक मुलगा सर्वांत प्रेरणादायी प्रेमळ सहभागी होता. वनवॅग्रीस शिकार करून आणि वन्यप्राण्यांपासून शेतकऱ्यांच्या शेताचे रक्षण करून आपली उपजीविका करतात; इतर ग्रामीण समुदाय त्यांना टाळतात ते मुख्य प्रवाहापासून पूर्णपणे अलिप्त असतात. त्यांची मतदार म्हणून नोंदणी नसल्याने राजकारण्यांनी या पूर्णपणे निरक्षर समुदायाची जबाबदारी स्वीकारली नाही. ही एक अत्यंत गुंतागुंतीची संस्कृती आहे ज्यामध्ये महिलांचे स्थान मजबूत आहे. वनवगरी मुलगा उपस्थित राहिला, कारण त्याच्या गटाकडे गाड्या ओढण्यासाठी काही उंट होते आणि हणवंतने त्याने येण्याचा आग्रह धरला होता. पण त्याला बसमधून प्रवास करताना प्रचंड अडचणी आल्या, कारण कंडक्टर आणि इतर काही प्रवाशांना त्याला बसू द्यायची इच्छा नव्हती. सुदैवाने त्याने चिकाटी ठेवली आणि साद्रीला पोहचण्यात यश मिळवले.

उंट संवर्धकांचे उत्साह त्यांच्या अपेक्षेपेक्षा जास्त असताना, निर्णय घेणाऱ्या व तांत्रिक सहाय्य देणाऱ्या संस्थांचा प्रतिसाद अत्यंत निराशाजनक होता.

त्यामुळे मीटिंग मूलत: तळागाळातील लोकांपैकी एक होती. याचे फायदे होते. कारण ते या प्रकरणाच्या गाभ्यापर्यंत लवकर पोहोचू शकले. परिचयांच्या फेरीनंतर, सहभागींना भूगोलावर आधारित तीन वेगवेगळ्या कार्यकारी गटांमध्ये विभागले - शुष्क क्षेत्र (बिकानेर, जैसलमेर आणि बारमेर), अरावली (उदयपूर, चित्तोड), आणि मध्यवर्ती क्षेत्र (पाली, जालोर आणि जयपूर). एका सूत्रधाराने पुढील प्रश्नांसह प्रत्येक चर्चेला मार्गदर्शन केले :

* उंटांची लोकसंख्या घटण्याची कारणे आहेत कोणती?
* चरण्याच्या संधी का गमावल्या आहेत?
* परिणाम काय आहेत?
* उंट कोणत्या दहा महत्त्वाच्या वनस्पती खातात?

✻ जगण्याचे डावपेच, योजना काय आहेत ? सध्याच्या परिस्थितीत प्रजनन हा किफायतशीर धंदा नसतांनाही उंट पालनकर्ते अजूनही कसे आणि का कळप पाळत आहेत ?

पुढील सत्रात नवीन कार्यगट तयार करण्यात आले आणि प्रत्येक वेगळ्या विषयांवर चर्चा करण्याचे काम नेमून दिले.

✻ चरण्याच्या संधी गमावण्यावर मात कशी करावी?

✻ रोगप्रतिबंधक आरोग्य सेवा आणि औषधांमध्ये सुधारणा कशी आणायची?

✻ उंट उत्पादनांची विक्री कशी सुधारावी? त्यानंतर प्रत्येक कार्यगटाने पूर्णांकामध्ये निष्कर्ष सादर केले आणि सर्वसाधारण चर्चा सुरू झाली. शेवटी पाच प्रमुख शिफारशींवर एकमत झाले.

उंट पाळणारे काय म्हणतात...

१७-१९ नोव्हेंबर दरम्यान, लोकहित पशु-पालक संस्थेने विविध समुदाय, जाती आणि धर्मांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आणि राजस्थानच्या जवळपास सर्व भागांतून आलेल्या सुमारे पन्नास उंट उत्पादक आणि मालकांसाठी राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा आयोजित केली होती. सखोल चर्चा केल्यानंतर, सहभागींनी एकमताने खालील कृती आणि बदलांची शिफारस केली :

१) पारंपरिक चराई क्षेत्र, ओळख याची पुनः स्थापना आणि नवीन चराई क्षेत्रांच्या व्यवस्थापनात लोकांचा सहभाग

२) राजस्थान डेअरी कायद्यात उंटांच्या दुधाचा समावेश.

३) उंटांच्या आरोग्य सेवेची उपलब्धता व साधी आणि प्रभावी लसीकरण प्रक्रिया.

४) निरोगी मादी-उंटांच्या कत्तलीस संपूर्ण बंदी.

५) उंटांवरील राष्ट्रीय संशोधन केंद्राच्या उपक्रमांचा विस्तार उंट-प्रजनन क्षेत्रापर्यंत करण्यात यावा.

कॅमल ब्रीडर्सचा प्रतिसाद आणि उत्साह पाहून ते आनंदी झाले, या सर्वांनी भर दिला की, ही पहिलीच वेळ आहे, - जेव्हा कोणीही त्यांना त्यांचे मत विचारले किंवा त्यांच्या परिस्थितीत रस घेतला. जैसलमेर येथील भोम सिंग या नेत्यांपैकी एकाने त्यांना स्थानिक गेस्टहाऊसमध्ये बुकींग करण्यासाठी खर्च केल्याबद्दल खडसावले. ''अशा छान गोष्टींवर पैसे का वाया घालवायचे?; आम्ही तुमच्या प्रशिक्षण केंद्राच्या मजल्यावर झोपू शकतो.''

काही दिवसांनंतर, २३-२५ नोव्हेंबर २००४ पर्यंत, त्यांना साद्री येथील एका मोठ्या तंबूत 'उंट आणि लोकांची उपजीविका' वाचवण्यासाठी भागदारांचे व्यासपीठ आयोजित केले. देश ज्या आर्थिक संधी गमावत आहे त्याबद्दल भारतीय निर्णय घेणाऱ्यांना प्रेरणा देण्यासाठी इतर देशांतील तज्ज्ञांना एकत्र करणे हा त्याचा उद्देश होता. मान्यवर आंतरराष्ट्रीय पाहुण्यांमध्ये कझाकस्तानमधील गौखर कोनुसपायेवा यांचा समावेश होता, ज्यांनी उंटाच्या दुधावर महत्त्वाचे काम केले होते आणि त्याचे आरोग्यवर्धक गुणधर्म स्पष्ट करू शकतील अशा रासायनिक घटकांसाठी त्याचे विश्लेषण केले होते. बर्नार्ड, तसेच दुबईचे डॉ. वेर्नरी, तिचे जुने स्नेही बकरी मुसा, बिकानेर येथील डॉ. टी. के. नॅशनल रिसर्च सेंटर ऑन कॅमलचे विद्यमान संचालक डॉ. सहानी यांनीही त्यांचे आमंत्रण स्वीकारले आणि एक शोधनिबंध सादर केला, ज्यामध्ये त्यांनी उंटांची संख्या आणि त्याची कारणे याविषयीचे त्यांचे मत मांडले. ही एकप्रकारची प्रगती होती. परंतु त्यांनी अनेक आमंत्रणे देऊनही, भारतीय राज्य किंवा केंद्र सरकारचा एकही प्रतिनिधी आला नाही.

पशुसंवर्धन विभाग या बैठकीत उपस्थित होते. म्हणून त्यांनी फक्त सर्व कागदपत्रे एका अहवालात संकलित केली आणि ज्यांना स्वारस्य असेल त्यांना ते पाठवले.

शास्त्रज्ञ काय म्हणतात...

भारत, फ्रान्स, जर्मनी, कझाकस्तान, ओमान, संयुक्त अरब अमिराती आणि ब्रिटनमधील संशोधन संस्था आणि गैर-सरकारी संस्थांमधील उंट तज्ज्ञ साद्री जिल्ह्यातील मम्माजी-की-धुनीजवळील लोकहित पशु-पालक संस्थेच्या प्रशिक्षण केंद्रात पाली, राजस्थान, भारत, २३-२५ नोव्हेंबर २००४ रोजी भेटले व ते म्हणाले की, ते राजस्थानच्या उंटांच्या लोकसंख्येतील नाट्यमय घसरणीकडे लक्ष वेधू इच्छितात. प्रामुख्याने चरण्याचे क्षेत्र कमी झाल्यामुळे आणि धोरणे आणि विकास कार्यक्रमांमध्ये उंटांकडे दुर्लक्ष केल्यामुळे हे झाले आहे.

त्यांना वाटत होते की, उंट हा राजस्थानच्या पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि संस्कृतीचा सध्या आणि भविष्यात अविभाज्य भाग आहे. हे राज्यासाठी रोजगाराचे महत्त्वपूर्ण स्रोत आहे, स्थानिक अर्थव्यवस्थेला दुष्काळाचा सामना करण्यास मदत करते आणि पर्यटन स्थळ म्हणून राजस्थानची ओळख आणि आकर्षणासाठी महत्त्वपूर्ण आहे. राजस्थानातील उंटांचे संवर्धन करण्यासाठी त्यांना खालील गोष्टींची तातडीची गरज वाटली -

उंटांच्या संख्येत होणारी घट थांबवण्यासाठी उंटांसाठी पुरेशी कुरण जमीन कशी पुनः स्थापित करता येईल याची तातडीने चौकशी करा.

उंटांच्या मालकांना आरोग्य सेवा सहज उपलब्ध करा. यात ट्रायपॅनोसोमियासिस आणि मांगेच्या रोगप्रतिबंधक आणि उपचारात्मक उपचारांचा समावेश असावा.

उंट उत्पादनांसाठी (जसे की दूध आणि मांस) नवीन उपलब्ध होणाऱ्या बाजारपेठेची संधी ओळखा आणि त्यांचा फायदा घेण्यासाठी शेतीच्या पद्धतीत बदल करा.

उंटांच्या इतर उत्पादनांना (दूध, लोकर, चामडे, शेण) आणि विक्रीला प्रोत्साहन द्या.

पर्यावरणपूरक वाहतुकीचा स्रोत म्हणून उंटांच्या गाड्यांचा वापर करण्यास प्रोत्साहन आणि अनुदान द्या.

राजस्थानच्या जैवविविधतेचा एक भाग म्हणून उंटाचे दीर्घकालीन संवर्धन करण्याच्या उद्देशाने प्रभावी, सर्वसमावेशक उंट धोरण विकसित करा. हे प्रजनन समुदायांशी व्यापक सल्लामसलत करून विकसित केले पाहिजे.

लोकहित पशुपालक संस्थान
प्रेस रिलीज
सादरी,
२५ नोव्हेंबर २००४

'उंट वाचवणे आणि लोकांचे जीवनमान: राजस्थानमध्ये उंटांच्या संवर्धनासाठी बहु-भागीदार व्यासपीठ तयार करणे' या शीर्षकाची तीन दिवसांची आंतरराष्ट्रीय परिषद आज राजस्थानमधील पाली जिल्ह्यातील सादरी येथील लोकहित पशुपालक संस्था या स्वयंसेवी संस्थेच्या प्रशिक्षण केंद्रात संपन्न झाली. भारत, फ्रान्स, जर्मनी, कझाकस्तान, ओमान, संयुक्त अरब अमिराती आणि यूके येथील संशोधन संस्था आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या शास्त्रज्ञांनी राजस्थानमधील उंटांच्या संख्येत झपाट्याने घट होण्याचे पुरावे आणि या प्रवृत्तीची मूळ कारणे यावर चर्चा केली. १९९७ ते २००३ दरम्यान, अधिकृत सरकारी आकडेवारी-नुसार, उंटांची संख्या २५% ने कमी झाली, परंतु काही

तज्ज्ञांचा असा विश्वास होता की, प्रत्यक्षात घट खूप जास्त असू शकते. गेल्या दोन वर्षांत पुष्कर मेळ्यात कत्तलीसाठी मोठ्या संख्येने मादी उंटांच्या विक्रीबद्दल त्यांना विशेषतः चिंता होती आणि त्यांनी याचे कारण उंट प्रजननातून आर्थिक उत्पन्नाचा अभाव असल्याचे सांगितले; ज्यामुळे रायका सारख्या पारंपरिक उंट प्रजनन समुदायांना त्यांचा वंशपरंपरागत व्यवसाय सोडावा लागला.

संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेने (FAO) तसेच, मिसेरिओर यांनी पाठिंबा दिलेल्या परिषदे दरम्यान, 'इतर देशांचे अनुभव' यावरही चर्चा झाली. फ्रान्समधील CIRAD मधील डॉ. बर्नार्ड फेय यांच्या मते, 'मोरोक्को आणि ट्युनिशियामध्ये उंट उत्पादनांसाठी उदयोन्मुख बाजारपेठेमुळे उंट प्रजननाचे पुनरुज्जीवन झाले आहे आणि त्यामुळे लोकसंख्येत वाढ झाली आहे.' ओमानमधील प्राध्यापक बाबिकर मुसा यांनी सांगितले की, 'आखाती देशांमध्ये उंटांच्या शर्यती हा मोठा व्यवसाय होता आणि एका उंटाची किंमत रु. १,००,००० ते रु. २,००,००० पर्यंत असू शकते.'

'राजस्थानमधील उंट वाचवण्यासाठी, सरकारला एक सक्षम धोरणात्मक चौकट तयार करावी लागेल' असे शास्त्रज्ञांनी ठामपणे सांगितले आणि त्यांनी धोरणकर्त्यांना सांगितलेल्या केलेल्या शिफारशींचा एक संच जारी केला. या निवेदनात त्यांनी असा विश्वास व्यक्त केला की, उंट हा राजस्थानच्या पर्यावरणाचा, अर्थव्यवस्थेचा आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग म्हणून भविष्यातही राखला पाहिजे. राज्यासाठी रोजगाराचा हा एक महत्त्वाचा स्रोत आहे, जो स्थानिक अर्थव्यवस्थेला दुष्काळाचा सामना करण्यास सक्षम करतो आणि राजस्थानची ओळख आणि पर्यटन स्थळ म्हणून आकर्षण निर्माण करण्यासाठी ते महत्त्वाचे आहे. त्यांनी पुढील कृती करण्याचे आवाहन केले: उंटांसाठी पुरेशी कुरणं कशी पुनर्संचयित करावी यासाठी सखोल चौकशी; उंटांच्या मालकांना उंट आरोग्य सेवांची सुलभ उपलब्धता, ज्यामध्ये ट्रायपॅनोसोमियासिस आणि मँगेवरील प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक उपचारांचा समावेश आहे; उंट उत्पादनांसाठी उदयोन्मुख बाजारपेठेतील संधी ओळखणे आणि शेती व्यवस्थेतील बदलांना पाठिंबा देणे जेणेकरून त्यांचा फायदा घेता येईल; उंट उत्पादनांचे (दूध, लोकर, चामडे, शेण) मूल्यवर्धन आणि विपणन प्रोत्साहन; वाहतुकीचा पर्यावरणपूरक स्रोत म्हणून उंट गाड्या वापरण्यासाठी अनुदान; आणि राजस्थानच्या जैवविविधतेचा भाग म्हणून उंटांचे दीर्घकालीन संवर्धन करण्यासाठी एक प्रभावी, व्यापक 'उंट धोरण' विकसित करणे. हे विविध भागधारकांशी, विशेषतः उंट-पालन समुदायांशी व्यापक सल्लामसलतीने विकसित केले पाहिजे.

**- सौ. अल्पना बापट**
डॉ. बापट हॉस्पीटल
ठाणे
भ्रमणध्वनी - ९८३३०२९३५६

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

**मार्च २०२४ – २५ शालांत परीक्षेचा निकाल एकूण ९७.३६% लागला.**

| | | |
|---|---|---|
| ९० च्या वर | विशेष श्रेणी | ०६ |
| ७५% ते ९०% पर्यंत | विशेष श्रेणी | ५२ |
| ६०% ते ७४% पर्यंत | प्रथम श्रेणी | ६८ |
| ४६% ते ५९% पर्यंत | द्वितीय श्रेणी | ३४ |
| ३५% ते ४५% पर्यंत | उत्तीर्ण | ०७ |

**शालांत परीक्षेतील गुणानुक्रमे प्रथम दहा विद्यार्थी**

| क्र. | विद्यार्थ्याचे नाव | एकूण गुण | टक्के |
|---|---|---|---|
| १ | जाधव श्रावणी आनंदा | ४७५ | ९५.०० |
| २ | पाटील गितेश मनोज | ४६७ | ९४.४० |
| ३ | जगताप आर्या दिनेश | ४६३ | ९४.०० |
| ४ | पाटील क्रिपा शरद | ४५७ | ९२.८० |
| ५ | गलांडे साईराज सुशीलकुमार | ४५८ | ९१.६० |
| ५ | विशे स्वरूप आशिष | ४५८ | ९१.६० |
| ७ | मालुसरे कादंबरी राजेश | ४५६ | ९१.२० |
| ८ | हजारे साई सोपान | ४४७ | ९०.४० |
| ९ | चौधरी साहिल मनोहर | ४४५ | ८९.०० |
| १० | सावंत वेदांत दिलीप | ४४४ | ८८.८० |

दि.२९ मार्च २०२५ रोजी कोटक एज्युकेशन फौंडेशन आयोजित ‘शाळा विकास ध्येय’ या विषयावर आधारित विद्यार्थी, पालक, शिक्षक कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्या परस्पर संवादातून, तसेच कृतियुक्त हालचालींतून ‘शाळा विकास ध्येय कसे गाठता येईल याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचेमार्फत पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती, तसेच पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल खालील प्रमाणे लागला. शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी खालीलप्रमाणे:–

कु. सई आंबेकर (५अ)

कु. नेहा साटम (५अ)

कु. वेद चव्हाण (५ब)

कु. अर्णव सरमळकर (५ड)

(ठाणे जिल्ह्यातून ३१५ वा क्रमांक )

कु. मनस्वी जाधव (८अ)

कु. अनुष्का अकोलकर (८अ)

या सर्व विद्यार्थ्यांना श्री. देसले, श्री. कोल्हे, श्री. शिरापुरी, श्री. शेलवले, सौ. धोत्रे, सौ. रोंगटे, सौ. पोटे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

दि .१३ जानेवारी रोजी ‘संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान’ तर्फे घेण्यात आलेल्या विविध परीक्षा स्पर्धेत आपल्या शाळेतील इ.५वी ते इ.८वी तील खालील विद्यार्थ्यांना सुवर्णपदक प्राप्त झाले.

१) शुभ्रा कळझुणकर (५अ )

२) अनय पोतनीस (६अ )

३) समृद्धी सावंत (६ब )

४) आदित्य खोत (७अ)

५) मिंजल रेणुसे (८अ)

६) जुईली ठाणेकर (८अ)

दि. १४ जून रोजी सकाळी ११ वाजता ब्रह्मयोग थेरपी संस्थेचे श्री. अशोक दानोळे यांचे शिक्षकांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले. एकाग्रता प्राणायाम, आहार, विहार या बाबतीत त्यांनी मौलिक मार्गदर्शन केले.

दि. १६ जून रोजी विद्यार्थ्यांचे नवीन शैक्षणिक वर्षात स्वागत करण्यासाठी 'लोकमत' वार्तापत्र मार्फत विद्यार्थ्यांचे फोटो काढण्यात आले. तसेच दि.२३ जून सोमवार रोजी इ. ५ वी च्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी सर्व मुलांचे औक्षण करण्यात आले. सौ. सायली माने बाईंनी विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षकांची ओळख करून दिली, तर सौ. केदारे बाईनी शाळेच्या इमारतीची ओळख करून दिली. यानंतर निवडक मुलांनी नवीन शाळेबद्दल आपली मनोगते थोडक्यात मांडली. मुख्या. वाघुले बाई यांनी विद्यार्थ्यांना शाळेचे नियम, शिस्त याबद्दल सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना लाडूचे वाटप करण्यात आले आणि अशा प्रकारे आनंदात आणि उत्साहात कार्यक्रम पार पडला.



दि. २१ जून सोमवार रोजी ब्रह्मयोग थेरपीचे श्री. अशोक दानोळे यांनी इ. ८वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी योगाची प्रात्यक्षिके घेऊन योगाचे महत्त्व, तसेच प्राणायामचे महत्त्व पटवून दिले.



दि. २८ जून शनिवार रोजी ठाणे महानगरपालिका प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, ठाणे यांचे अधिकारी श्री. योगेश शर्मा, तसेच आर.डी.एम.सी चे अधिकारी श्री. यासीन तडवी यांनी शाळेतील इ. ९वी आणि १०वीच्या विद्यार्थ्यांना आपत्तीपूर्वकाळात, आपत्ती नंतरच्या काळात, तसेच आपत्कालीन परिस्थितीत नियोजन व व्यवस्थापन कसे करावे याबाबत मार्गदर्शन केले.





आषाढी एकादशी निमित्त आषाढी एकादशी दिवशी शाळेतील स्काऊट गाईड पथकाने महागिरी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सकाळी सात ते दुपारी एक वाजेपर्यंत प्रसाद वाटप करणे, भक्तांना रांगेत सोडणे, देणगी पावती पुस्तक लिहिणे अशा प्रकारची सेवा दिली.



स्काऊट गाईड पथकात गाईड कॅप्टन सौ. कल्पना बोरवणकर यांच्यासोबत एकूण १६ गाईड व ४ स्काऊट उपस्थित होते.

दि. १० जुलै गुरुवार रोजी इ. ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'गुरुपौर्णिमा' कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यानिमित्ताने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी श्रीमती वैशाली किशोर नारखेडे (शिक्षिका, समुपदेशक – महात्मा गांधी विद्यालय, अंबरनाथ) उपस्थित होत्या. रुद्राक्ष देसाई, निरव भोईर, सार्थक भोर, अनिश गजमल, यश बोरघरे, अनय पोतनीस या विद्यार्थ्यांनी भाषणातून आपले मनोगत व्यक्त केले. मुख्या. कल्पना वाघुले बाईंनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर अनेक लहान सहान गोष्टीच्या माध्यमातून प्रमुख पाहुण्यांनी गुरू-शिष्य नाते व गुरूचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.




दि. १० जुलै २५ रोजी इ. ८वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'गुरुपौर्णिमा' कार्यक्रम साजरा केला गेला. या कार्यक्रमासाठी श्री. दीपक धोंडे सर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी गोष्टीरुपाने गुरुपौर्णिमेचे महत्त्व स्पष्ट केले. इ. ८वी साठी सौ दडपे, श्री शेलवले, श्री. तळेले यांनी नियोजन केले. तर इ. १०वी साठी सौ. तातळे, सौ रोंगटे, सौ दातार, सौ धनगर यांनी नियोजन केले. शाळेच्या उपमुख्याध्यापिका सौ. बोऱ्हाडे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांच्या सुंदर गीताने कार्यक्रम पार पडला.



इ. ८वी मधील राज्य पुरस्कार परीक्षेसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांचा हायकिंग उपक्रमांतर्गत प्रत्येकाने दहा किलोमीटर चालणे व वाटेत जे विशेष ठिकाण असेल त्याची, तसेच जंगलवाटेवरील झाडे, पक्षी, फुले यांची नोंद घेत जाणे व फोटोग्राफी करणे अपेक्षित आहे.

यावर्षी ५ स्काऊट आणि १५ गाईड यांनी दि. १५ जुलै रोजी येऊर ते जांभूळपाडा (१२ ते १५ किलोमीटर) एवढे अंतर पायी पूर्ण केले. विद्यार्थ्यांसोबत गाईड कॅप्टन सौ. कल्पना बोरवणकर व स्काऊट मास्टर श्री. संजय तळेले उपस्थित होते.



महाराष्ट्र नेवल युनिट मुंबई तर्फे नाशिक येथे दि. १९ जुलै ते २८ जुलै या कालावधीत एकूण दहा दिवसांचा CATC कॅम्प आयोजित करण्यात आला. यामध्ये मुंबई विभागातील ३०० कॅडेट्स सहभागी झाले होते. कॅडेट्सना शिस्त, कवायत, शारीरिक कसरत मिळावी या उद्देशाने क्रीडा स्पर्धा, तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात आले होते. हॉलीबॉल स्पर्धेत आपल्या शाळेने प्रथम क्रमांक पटकावला. आपल्या शाळेतील एकूण १८ कॅडेट्स सोबत मार्गदर्शन करण्यासाठी A.N.O. श्री संजय दिघे सर उपस्थित होते.



जो चांगल्या वृक्षाचा आधार घेतो त्याला चांगलीच सावली लाभते!

दि. २३ जुलै बुधवार रोजी इ. ५वी ते ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'सायबर सुरक्षा' हा कार्यक्रम आयोजित केला. बांदोडकर कॉलेजमधील बी.एस.सी. आयटी च्या विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमातून मोबाईल तसेच इंटरनेट वापरताना विद्यार्थ्यांनी कोणत्या प्रकारची काळजी घ्यायला हवी, तसेच ॲप डाऊनलोड करताना गेम खेळताना काय करावे काय करू नये याबद्दल मार्गदर्शन केले.



दि. २३ जुलै बुधवार रोजी सकाळ आणि दुपार विभागातून दीप अमावस्या साजरी केली. या निमित्ताने सर्व वर्गांतून 'दीप अमावस्या' विषयी माहिती सांगितली. तसेच इ. ८वी च्या विद्यार्थिनींनी प्रत्येक मजल्यावर दीप, अगरबत्ती लावून वातावरण सुगंधित आणि चैतन्यमय केले.






लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त सकाळ व दुपार दोन्ही विभागात हस्ताक्षर आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. दि. १ ऑगस्ट रोजी इ. ८वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी लोकमान्य टिळक पुण्यतिथी कार्यक्रम घेण्यात आला. यानिमित्ताने झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत, तसेच हस्ताक्षर स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रके देण्यात आली. सकाळ विभागात सौ. कुमावत, तर दुपार विभागात उपमुख्याध्यापिका सौ. बोराडे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रके वाटप करण्यात आली. प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांनी आपली भाषणे सादर केली. या प्रसंगी सौ. दातार बाई, सौ. बोरूळकर बाई यांनी देखील आपले विचार मांडले.




शनिवार दि. २ ऑगस्ट रोजी ब्लॅक डायमंड जितेंद्र सिंग राठोड व सौ. मिनल चौधरी यांनी - SCLEPIUS Wellness House कंपनीच्या आयुर्वेदिक औषधामार्फत 'विविध रोगांवर उपचार' या विषयावर शिक्षकांची कार्यशाळा घेतली.

३१वी ठाणे महापालिका वर्षा मॅरेथॉन २०२५ दि. १० ऑगस्ट रविवार रोजी आयोजित केली होती. त्यात आपल्या शाळेतील इ. ७, ८वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



दुःख हे बैलालासुद्धा कोकिळासारखं गायला लावतं.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

दिनांक १० जुलै २०२५ गुरुपौर्णिमा या दिवशी ''गुरूने दिला ज्ञानरूपी वसा, आम्ही चालवू हा पुढे वारसा'' याप्रमाणे ए. के. जोशी शाळेच्या प्राथमिक विभागामध्ये गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. या दिवशी मुलांनी शिक्षकांसाठी वेगवेगळी गाणी, कविता गायल्या. गुरू-शिष्यावर आधारित गोष्टी सांगितल्या गेल्या. तसेच गुरुपौर्णिमा का साजरी केली जाते ? व त्याचे महत्त्व काय हे परिपाठाच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. मुलांनी पुष्पगुच्छ देऊन शिक्षकांना वंदन केले.



## जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

### बेडेकर महाविद्यालयात इतिहासातील गंमतींवर परिसंवाद

मानवाच्या उत्क्रांतीत दगडाची खूप महत्त्वाची भूमिका दिसून आली आहे. दगडापासून निर्माण केलेली हत्यारे, शिकारीसाठी, स्वसंरक्षणासाठी; तसेच फळभाज्या, मांस कापण्यासाठी वापरली जात असत. त्याचप्रमाणे उत्खननात सापडलेले मडक्यांचे अवशेष, त्याकाळातील सामाजिक जीवनाबद्दल खूप माहिती देतात. नाणी ही त्याकाळातील व्यवहारिक जीवनाचे दर्शन घडवतात. अशाच पुरातत्त्वाची ओळख करून देणाऱ्या अवशेषांच्या प्रदर्शनाचे आयोजन ठाण्यातील जोशी-बेडेकर महाविद्यालयात करण्यात आले होते.

प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे हे नेहमीच इतिहास, पुरातत्त्व व संस्कृती या विषयांवर अनेक उपक्रम राबवत असतात. सिंधू संस्कृतीवरील प्रदर्शनाच्या यशानंतर आता 'प्राच्यविद्या अभ्यास संस्था' व 'इतिहासाच्या पाऊलखुणा' या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने, ४ व ५ जुलै रोजी, पुरातत्त्वीय वस्तू आणि छायाचित्रांचे प्रदर्शन व व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

या प्रदर्शनात अश्मयुगातील ऐतिहासिक हत्यारे, नाणी, मडकी अशा सर्व गोष्टींचा समावेश होता. पुरातत्त्वज्ञ डॉ जयंत जोगळेकर, इतिहासाचे सहाय्यक प्राध्यापक अंकुर काणे आणि सहाय्यक प्राध्यापिका साईश्रुती भट्ट यांच्या विविध भागांतील भटकंतीदरम्यान सापडलेल्या इतिहासाचा अमूल्य दस्तऐवज या प्रदर्शनातून नागरिकांसाठी खुला करण्यात आला होता.

'प - पुरातत्त्वाचा' असे ह्या प्रदर्शनाचे नाव असून, या प्रदर्शनात अश्मयुगातील हत्यारे, हडप्पा संस्कृतीतील मडक्यांचे अवशेष, महाजनपद काळातील नाणी, तसेच लेणी, मंदिरे, दुर्ग, यांची छायाचित्रे असे सर्वकाही पाहण्यासाठी उपलब्ध होते. प्रदर्शनातील सर्व गोष्टींची माहिती इतिहास विभागाचे सहाय्यक प्राध्यापक अंकुर काणे, प्राध्यापिका साईश्रुती भट्ट व त्यांचे महाविद्यालयीन विद्यार्थी देत होते.

प्रदर्शनाच्या दोन्ही दिवशी इतिहासप्रेमींनी या प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शनिवार ५ जुलै हा प्रदर्शनाचा शेवटचा दिवस होता. या दिवशी 'इतिहासातील गमती जमती' या विषयावर, 'इतिहासाच्या पाऊलखुणा' या संस्थेतील पुरातत्त्वज्ञ श्री कौस्तुभ कस्तुरे, श्री सौरभ वैशंपायन, श्री संकेत कुलकर्णी, श्री तुषार माने व डॉ. सागर पाध्ये यांचा परिसंवाद ठेवण्यात आला होता.

ह्या परिसंवादाला, वि.प्र.मं. चे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. सुचित्रा नाईक,

तसेच इतिहास व इतर विभागांतील प्राध्यापकांनी आवर्जून उपस्थिती दर्शवली. मराठी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक श्री रुपेश महाडिक यांनी ह्या व्याख्यानाचे सूत्रसंचालन केले.

नावाला साजेसा अशा ह्या परिसंवादात इतिहासातील अनेक न माहीत असलेल्या गमती जमती श्रोत्यांना कळल्या. कुठलीही घडलेली घटना ही इतिहास असते असं म्हणत सुरू झालेल्या ह्या परिसंवादात काही किश्श्यांतून औरंगजेबा बद्दल माहिती, शिवाजी महाराज व पेशवे बाजीराव ह्यांच्या आयुष्यात घडलेल्या समान घटना, रशिया स्वीडनच्या युद्धाची कहाणी, अमेरिकेचा स्वयंघोषित सम्राट अशा सर्व गोष्टींची माहिती देण्यात आली. संवादाच्या शेवटी श्रोत्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

महाविद्यालयातील वाणिज्य विभागाने बुधवार दि. ५ जुलै, २०२५ रोजी 'रिसर्च प्रोजेक्ट ओरिएंटेशन' या विषयावर व्याख्यान आयोजित केले. रश्मी अग्निहोत्री या ह्या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या होत्या. कार्यक्रमात एकूण ५१ विद्यार्थी उपस्थित होते. 'रिसर्च प्रोजेक्ट' कसा करावा हे विद्यार्थ्यांना समजावे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते.

महाविद्यालयातील 'राष्ट्रीय स्वयंसेवक योजना आणि बिझनेस लॉ' विभागाने दि. ८ जुलै ते १२ जुलै, २०२५ रोजी 'कागदी पिशवी बनवणे व त्यांचे वाटप करणे' या कार्यक्रमात एकूण ७० विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्दिष्ट पर्यावरणाविषयी जागरूकता वाढवणे व प्लास्टिकचे पर्यावरणपूरक पर्याय वापरण्यास प्रोत्साहित करणे हा होता. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतः कागदी पिशव्या बनवल्या व विक्रेत्यांना विकल्या. या उपक्रमात एकूण ५०६ कागदी पिशव्या विद्यार्थ्यांनी बनवल्या व वाटल्या.

महाविद्यालयातील संस्कृत विभागाने बुधवार दि. १० जुलै, २०२५ रोजी महाकवी कालिदास जयंती व गुरुपौर्णिमा साजरी केली. या कार्यक्रमात एकूण २५ विद्यार्थी उपस्थित होते. महाकवी कालिदास यांच्या साहित्याला पुन्हा भेट देणे व तसेच गुरूप्रति कृतज्ञता व्यक्त करणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते.

महाविद्यालयातील बी.कॉम इन फायनान्सियल मार्केट्स विभागाने बुधवार दि. १० जुलै, २०२५ रोजी 'अंकॉन्वेंशनल करियर इन फायनान्स' या विषयावर व्याख्यान आयोजित केले. हेतिका लथानी या ह्या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी होत्या. कार्यक्रमात एकूण ५७ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना वित्त क्षेत्रातील विविध सांध्यांची माहिती देणे हे या कार्यक्रमाचे उद्दीष्ट होते.

बी.कॉम इन अकाउंट्स अँड फायनान्स विभागाने दिनांक १२ जुलै, २०२५ रोजी महाविद्यालयातील कात्यायन सभागृहात अकाउंट्ससाठी लागणारी आय ची साधने याविषयी अर्धा दिवसीय कार्यशाळा आयोजित केली. श्री. सुरेश वर्मा व श्री. जाहीर अब्बास सय्यद हे या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी होते. या कार्यक्रमाला एकूण ३६२ विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमाचे उद्देश्य तंत्रज्ञान वित्त विभागात जागरूकता निर्माण करणे हा होता. या कार्यशाळेने विद्यार्थ्यांना करियरसाठी लागणारी कौशल्ये वृद्धिंगत करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

महाविद्यालयातील 'स्किल डेव्हलपमेंट अँड आंत्रप्रेनेरशिप सेल'ने दिनांक १५ जुलै, २०२५ रोजी महाविद्यालयात 'जागतिक युवा कौशल्य दिन' साजरा केला. लिओना अल्फान्सो या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी होत्या. या कार्यक्रमाला एकूण २६९ विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमाचे उद्देश्य विद्यार्थ्यांमध्ये ए. आय. वापरण्याचे कौशल्य वृद्धिंगत करणे हा होता.

महाविद्यालयातील इंग्रजी विभागाने दि. १८ जुलै २०२५ रोजी 'टेक्स्ट बेस्ड फिल्म स्क्रीनिंग ऑफ हॅम्लेट' या उपक्रमाचे आयोजन केले. हा कार्यक्रम कात्यायन सभागृहात संपन्न झाला. या कार्यक्रमात एकूण ४ शिक्षक व ६२ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना विलियम शेक्सपिअर लिखित 'हॅम्लेट' या नाटकाच्या नाट्यरूप सादरीकरणाशी परिचय करून देणे असा होता. कार्यक्रम इंग्रजी विषयाच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला होता. विशेषतः तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमामध्ये हे नाटक समाविष्ट असल्यामुळे, विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

महाविद्यालयातील 'बी.कॉम इन बँकिंग अँड इन्शुरन्स' विभागाने शनिवार दि. १९ जुलै, २०२५ रोजी '५६वा बँक राष्ट्रीयीकरण दिवस' साजरा केला. या कार्यक्रमात एकूण ३५ विद्यार्थी व ५ शिक्षक उपस्थित होते. यात विद्यार्थ्यांसाठी बँकिंग थीम संदर्भात विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

महाविद्यालयातील 'बीकॉम इन अकाउंटिंग अँड फायनान्स विभागाने शनिवार दि. १९ जुलै,२०२५ रोजी 'आ.र.बी.आय. चलन संग्रहालय' हा उपक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात एकूण ४७६ विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमाचे उद्दिष्ट ५६वा बँक राष्ट्रीयीकरण दिवस साजरा करणे, व आ.र.बी.आय चे ऐतिहासिक व आर्थिक महत्त्व विद्यार्थ्यांना समजण्यास प्रयत्न करा हे होते.

**महाविद्यालयात श्रावण फूड फेस्टिव्हलला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

'डिपार्टमेंट ऑफ लाइफलाँग लर्निंग अँड एक्स्टेन्शन (DLLE)' यांच्यावतीने बुधवार, २३ जुलै २०२५ रोजी Shravan Food Festival चे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात एकूण १७ विद्यार्थी आणि २ प्राध्यापक सहभागी झाले होते.

या खाद्य महोत्सवाचे उद्दिष्ट म्हणजे श्रावण महिन्याच्या निमित्ताने भारताची समृद्ध खाद्यसंस्कृती आणि विविधतेने भरलेला शाकाहारी आहार विद्यार्थ्यांपुढे सादर करणे होय. विविध प्रांतांतील पारंपरिक आणि सात्विक पदार्थ विद्यार्थ्यांनी स्वतः बनवून, सादर करून आणि विक्री करून आपली सर्जनशीलता, उद्यमशीलता, तसेच संघटन कौशल्य दाखवले.

या उपक्रमामुळे 'एकात्मतेत वैविध्य' हे तत्त्व प्रत्यक्षात उतरवण्यात आले. विद्यार्थ्यांनी stall व्यवस्थापन, बजेट नियोजन, आणि संवाद कौशल्य यांतून अनुभव मिळवला. महाविद्यालयातील वातावरण अधिक समावेशक आणि सणासुदीचे बनले. अन्नाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी एकमेकांशी सुसंवाद साधला आणि सांस्कृतिक बंध अधिक दृढ केले.

या यशस्वी उपक्रमाचे आयोजन डॉ. संगीता मोहांती यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.

महाविद्यालयात 'सप्लिंग प्लांटेशन ॲक्टिव्हिटी'द्वारे पर्यावरणप्रेमाला चालना

'डिपार्टमेंट ऑफ लाइफ लॉन्ग लर्निंग अँड एक्स्टेन्शन (DLLE)' च्या वतीने रविवार, २७ जुलै २०२५ रोजी सकाळी ८ ते १० वाजता कासारवडवली नर्सरी येथे 'Sapling Plantation Activity' घेण्यात आली. १० विद्यार्थी आणि १ शिक्षक या उपक्रमात सहभागी झाले. संसाधन व्यक्ती म्हणून उन्नती राजेश वर्साळे व अविनाश गोडबोले ह्यांचे मार्गदर्शन लाभले.

या वृक्षारोपण उपक्रमामागील मुख्य हेतू म्हणजे पर्यावरण रक्षण, जैवविविधतेचा संवर्धन, आणि हवा व पाण्याचे संवर्धन. यामार्फत विद्यार्थ्यांना वृक्षांचे महत्त्व

आणि नैसर्गिक संतुलन राखण्यात त्यांचे योगदान समजावून देण्यात आले.

उपक्रमाच्या माध्यमातून शाश्वत भविष्यासाठी पर्यावरणीय जबाबदारीची भावना निर्माण करणे, शहरी उष्णतेचा परिणाम कमी करणे, आणि सामाजिक सजगता वाढवणे यासारख्या बाबींवर भर देण्यात आला. वृक्षारोपणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सामूहिक कार्यसंस्कृती, जबाबदारीची जाणीव आणि निसर्गप्रेम जागृत झाले.

या प्रेरणादायी उपक्रमाचे आयोजन डॉ. संगीता मोहांती यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

- **महाविद्यालयाचे १ जुलै पासून द्वितीय वर्ष विधी आणि तृतीय वर्ष विधी चे वर्ग सुरू झाले.**

शैक्षणिक वर्षाचे उद्घाटन १ जुलै २०२५ रोजी संस्थेत माननीय न्यायिक अधिकारी श्री. सदाशिव देशमुख आणि श्री. अर्जुन वाडकर यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी कार्यक्रमाबाबत थोडक्यात माहिती दिली. न्यायालयीन कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी त्यांनी न्यायालयांना भेट देण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या संक्षिप्त संदेशात त्यांनी भर दिला की, विद्यार्थ्यांनी सर्व स्तरातील न्यायालयांना भेट देऊन कामकाज कसे चालते हे पाहावे. विद्यार्थ्यांना महत्त्वाच्या पैलूंबद्दल अंतर्दृष्टी मिळविण्यास मदत करण्यासाठी अशा सत्रांचे आयोजन करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. प्रा. श्रीमती कृष्णा कामत आणि प्रा. श्री. विनोद वाघ यांनी पाहुण्यांचा थोडक्यात परिचय करून दिला.

माननीय श्री. अर्जुन वाडकर यांनी त्यांचे विचार मांडले आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अतिशय विनोदी शैलीत त्यांनी त्यांच्या संवादात मांडलेल्या मुद्यांचा सारांश खाली दिला आहे.

- भीतीवर मात करण्यासाठी आत्मविश्वास हा सर्वांत महत्त्वाचा गुण आहे जो वाढवला पाहिजे. त्यांनी असेही नमूद केले की, आत्मविश्वास महत्त्वाचा असला तरी, अहंकार बाजूला ठेवून इतर सल्लागारांशी सौहार्दपूर्ण संबंध असले पाहिजेत.
- त्यांनी नमूद केले की, वकिली हा एकमेव व्यवसाय आहे जिथे एक वकील दुसऱ्या वकीलांसाठी नोकरी निर्माण करतो.
- इच्छुक वकिलांनी हे समजून घेतले पाहिजे की, युक्तिवाद करणे ही वकिलांची एकमेव भूमिका नाही, तर त्यांनी मसुदा कौशल्ये आणि लोक कौशल्यांवर देखील लक्ष केंद्रित केले पाहिजे.
- आजकाल क्लायंट देखील शिकलेले असल्याने त्यांनी नमूद केले की, इच्छुक वकिलांनी पटवून देण्याची कला शिकली पाहिजे.
- त्यांनी कामाच्या जीवनात संतुलन राखण्याचे महत्त्व अधोरेखित केले आणि आरोग्याची काळजी घेतली पाहिजे, कोणत्या ना कोणत्या खेळात सहभागी होऊन सक्रिय जीवनशैली जगली पाहिजे, काही वाद्य शिकले पाहिजे आणि काही कला शिकली पाहिजे असा इशारा दिला.
- लोकांची मानसिकता समजून घेण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना मानसशास्त्र शिकण्याचा सल्लाही दिला.
- आजच्या जगात, व्यवहारात दृढ राहण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक संबंध वाढवण्यास आणि विविध प्रकारची पुस्तके वाचण्यास सांगितले.

♦ त्यांनी असा निष्कर्ष काढला की, माननीय न्यायाधीशांना खटल्यातील कोणतेही तथ्य माहीत नाही असे गृहीत धरून युक्तिवाद सुरू करा आणि त्यांना खटल्याबद्दल सर्व काही समजले आहे असे गृहीत धरून युक्तिवाद थांबवा.

सत्राच्या दुसऱ्या भागात, माननीय श्री. सदाशिव देशमुख यांनी विद्यार्थ्यांना बरीच व्यावहारिक माहिती दिली.

♦ न्यायाधीशांना एखादी व्यक्ती प्रामाणिक आहे की नाही हे समजते यावर त्यांनी भर दिला, म्हणून विद्यार्थ्यांना न्यायालयीन कामकाजादरम्यान प्रामाणिक राहण्याची विनंती केली. न्यायाधीश कनिष्ठ वकिलांना प्रोत्साहन देतात आणि म्हणूनच वस्तुस्थिती मांडताना काळजी करू नये असेही त्यांनी नमूद केले.

♦ वकिलांनी आचरणात आणलेल्या सर्वांत महत्त्वाच्या गुणांपैकी एक म्हणजे संयम.

♦ जर एखाद्याला शिकायचे असेल आणि त्यांच्याशी चांगले संबंध ठेवायचे असतील तर त्यांनी न्यायालयीन कामकाज सुरू होण्यापूर्वी किमान एक तास आधी यावे आणि न्यायालयीन कामकाज संपल्यानंतर एक तास थांबावे असे त्यांनी सुचवले. यामुळे अकाउंटना खूप आत्मविश्वास मिळतो आणि ते अशा वकिलांना महत्त्व देतात.

♦ युक्तिवादात चांगले होण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना एक व्यावहारिक सल्ला दिला – दररोज एक निकाल वाचा आणि त्यातील तथ्ये, वादग्रस्त मुद्दे आणि काय मांडले आहे ते लिहा. उदाहरणांची चांगली समज होण्यासाठी हे वारंवार पहा.

♦ त्यांनी विद्यार्थ्यांना पुढे न्यायव्यवस्थेत भूमिका घेण्याचे आवाहन केले.

♦ सर्वांत महत्त्वाचा मुद्दा जो समजून घेतला पाहिजे तो म्हणजे वकिलांची देश आणि समाजाप्रती मोठी जबाबदारी असते. कारण ते देशाच्या संसाधनांचा वापर करून कायदा शिकतात.

♦ यशस्वी होण्यासाठी, त्यांनी सचोटी, प्रामाणिकपणा आणि उपलब्धता रुजवण्यावर भर दिला.

♦ इंटर्नशिपबद्दल त्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी इंटर्नशिप करणाऱ्या फर्मसाठी सार मूल्य निर्माण केले पाहिजे.

♦ त्यांनी दोन उत्तम उदाहरणे देऊन समारोप केला – एकदा, जपानी राजदूताला विचारण्यात आले की, जपान खूपच लहान भौगोलिक आकार आणि लोकसंख्या असूनही इतका प्रगत का आहे? त्यांचे उत्तर होते – कारण भारताची लोकसंख्या जास्त आहे आणि जपानमध्ये जास्त 'नागरिक' आहेत! वेबस्टरच्या दुसऱ्या उदाहरणात – ज्याने कारपेंटरसाठी केस लढवली आणि फक्त १ फी घेतली. त्या केसमधील त्यांच्या कामामुळे त्यांना काही वर्षांनी रेल्वे कंपनीसाठी केस जिंकण्यास मदत झाली ज्याने त्यांना $10k दिले. संदेश असा होता – प्रयत्न कधीही वाया जाणार नाहीत, ते योग्य वेळी फळ देतील.

पाहुण्यांनी विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे दिली आणि त्यांच्या समृद्ध अनुभवाच्या आधारे त्यांना मार्गदर्शन केले.



- **महाविद्यालयाचे दि. २ जुलै पासून एल. एल. एम. चे वर्ग सुरू झाले.**

**एस.एस.टी महाविद्यालय, उल्हासनगर आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमानाने दिनांक २ जुलै रोजी ५८ वा युथ फेस्टिवलचे आयोजन :**

दिनांक २ जुलै २०२५ रोजी एस.एस.टी. महाविद्यालय उल्हासनगर या ठिकाणी मुंबई विद्यापीठाच्या ५८ व्या युवा महोत्सव स्पर्धेसंदर्भात वर्कशॉप आयोजित करण्यात आला होता. या वर्कशॉपला विद्या प्रसारक मंडळ टी.एम.सी. आपल्या विधी महाविद्यालयातर्फे शिक्षक श्री. शिवाजी बिबे सर व विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून द्वितीय वर्षातील गौरव गायकवाड व आदिती देहेरकर हे विद्यार्थी उपस्थित होते. या वर्कशॉप मध्ये श्री. निलेश सावे सांस्कृतिक विभाग प्रमुख यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले. युथ स्पर्धेमध्ये सहभागी होताना आणि स्पर्धेची नेमकी कशी तयारी करायची, तसेच त्या संबंधीचे सर्व नियम व इतर छोट्या छोट्या गोष्टी श्री. निलेश सावे यांनी उपस्थितांना समजावून सांगितल्या. तत्प्रसंगी चित्रपट क्षेत्रातील श्री. अनिल जाधव हे देखील उपस्थित होते व त्यांनी गायना विषयी, वाद्याविषयी विशेष मार्गदर्शन केले. अभिनय स्पर्धा, गायन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वाद्य स्पर्धा व इतर सर्वच प्रकारातील स्पर्धांविषयी मार्गदर्शन लाभल्याने उपस्थित विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना व शिक्षकांना उत्साह मिळाला व स्पर्धेसंबंधीचे चित्र बरेचसे स्पष्ट झाले. आपल्या महाविद्यालयातर्फे गौरव गायकवाड या विद्यार्थ्याने मनोगत व्यक्त केले व आभार मानले.

**केस माहिती प्रणाली (इन्फॉर्मेशन सिस्टीम) आणि ई-फायलिंग या विषयावर कार्यशाळा : ५ जुलै २०२५**

५ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ६:०० ते ७:०० या वेळेत ठाणे येथील महाविद्यालयामधील रूम एल-४ मध्ये केस इन्फॉर्मेशन सिस्टम आणि ई-फायलिंग या विषयावर एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना भारतीय न्यायव्यवस्थेतील डिजिटल परिवर्तनाची ओळख करून देणे, विशेषतः ई-फायलिंग आणि केस मॅनेजमेंटच्या व्यावहारिक पैलूंवर लक्ष केंद्रित करणे हे होते. या कार्यशाळेत एलएलबीच्या तिसऱ्या वर्षाच्या ५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. कार्यशाळेच्या सुरुवातीस प्रा. विनोद वाघ सर ह्यांनी प्रमुख वक्ते ह्यांचे स्वागत करत, त्यांनी कायदेशीर व्यवसायात शैक्षणिक शिक्षणासोबत व्यावहारिक ज्ञान मिळवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. प्रो. यतीन पंडित यांनी आदरणीय प्रमुख पाहुणे , महाराष्ट्र राज्य न्यायिक कर्मचारी महासंघ (ग्रुप-क) च्या मुंबई विभागाचे उपाध्यक्ष आणि तृतीय वर्ष विधीचे अभिमानी विद्यार्थी श्री. गुरुनाथ एस. माने यांची ओळख करून दिली. केस इन्फॉर्मेशन सिस्टीम आणि ई-फायलिंगवरील श्री. माने यांच्या अभ्यासपूर्ण सादरीकरणामुळे विद्यार्थ्यांना न्यायालयाच्या डिजिटल पायाभूत सुविधांची प्रत्यक्ष माहिती मिळाली. कार्यशाळेचा समारोप तृतीय वर्षाचे विद्यार्थी श्री. दुबे यांनी विचारपूर्वक केलेल्या आभार प्रदर्शनाने झाला, ज्यांनी कार्यशाळा अर्थपूर्ण आणि परस्परसंवादी बनवल्याबद्दल वक्ते, प्राध्यापक आणि उपस्थितांचे आभार मानले.कार्यशाळेला चांगला प्रतिसाद मिळाला आणि कायद्याच्या क्षेत्रातील सिद्धांत आणि व्यवहारातील दरी भरून काढत विद्यार्थ्यांसाठी हा एक मौल्यवान अनुभव ठरला.



**५ जुलै २०२५ रोजी के. एस. जोशी कला महाविद्यालय आणि एन.जी. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय आयोजित गेटकीपर प्रशिक्षण कार्यशाळा :**

के. एस. जोशी कला महाविद्यालय आणि एन. जी. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय आयोजित 'गेटकीपर प्रशिक्षण कार्यशाळेत' वि प्र मं चे विधी महाविद्यालयातील सहाय्यक प्रा. हेतल मिशेरी, प्रा. कृष्णा कामत, प्रा. मनोजकुमार नाईक, डॉ. प्रा. रुपाली जामोदे, प्रा. प्रेरणा वसावे यांनी सहभाग घेतला.



**EBC Reader प्रशिक्षण १७ जुलै :**

महाविद्यालयातर्फे घेण्यात आलेल्या EBC Reader ह्या विधी पुस्तकांचा डेटाबेस संबंधी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याकरिता विशेष सत्र दिनांक १७ जुलै रोजी सायंकाळी ६.०० वाजता मुट कोर्ट सभागृह येथे आयोजित करण्यात आले होते. कंपनी तर्फे श्री. अविनाश पांडे ह्यांची ह्या प्रशिक्षणा करिता नेमणूक करण्यात आली होती. सत्राच्या सुरुवातीला ग्रंथपाल शीतल सोनावणे ह्यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. त्यानंतर प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयीनुसार वाचन करता यावे ह्याकरिता महाविद्यालयाने डेटाबेस उपलब्ध करून दिला आहे ह्या विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. विद्यार्थ्यांनी देखील आपल्या सर्व शंकांचे निरसन ह्या प्रशिक्षणा दरम्यान करून घेतले.





**२२ जुलै २०२५ रोजी 'वकिलांसाठी मानसशास्त्र' या विषयावर एक दिवसाची कार्यशाळा :**

'वकिलांसाठी मानसशास्त्र' या विषयावर मंगळवार, २२ जुलै, २०२५ रोजी संध्याकाळी ६ वाजता एक दिवसाची कार्यशाळा महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेच्या उद्घाटनावेळी, सहायक प्राध्यापक श्री. मनोजकुमार नाईक यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि सहायक प्राध्यापक हेतल मेश्री यांना प्रमुख वक्ता ॲड. पौर्णिमा भंडारी यांचे स्वागत करण्याची विनंती केली. कार्यशाळेचे सूत्रसंचालन करताना त्यांनी या विषयाचे महत्त्व आणि कार्यशाळेचा उद्देश याबद्दल सांगितले. प्रमुख वक्त्या ॲड. पौर्णिमा भंडारी यांनी आपल्या भाषणात वकिलांनी न्यायाधीशांसमोर हजर असताना आणि पक्षकारांना भेटताना काय करावे आणि काय करू नये यावर विशेष भर दिला. त्यांनी वकिली व्यवसायात मानसशास्त्र समजून घेण्याचे महत्त्वही स्पष्ट केले. कार्यशाळेचा समारोप सहायक प्राध्यापक हेतल मेशेरी यांनी आभार प्रदर्शनाने केला.



- **दि. १८ आणि १९ जुलै रोजी सत्र – २ आणि सत्र – ४ पुनर्मूल्यांकन निकाल जाहीर करण्यात आला.**

**एक दिवसीय कार्यशाळा भूमी कायद्यातील सराव व व्यावहारिक ज्ञानातील संधी : २६ जुलै २०२५**

महाविद्यालयात 'भूमी कायद्यातील सराव व व्यावहारिक ज्ञानातील संधी' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा शनिवार, दिनांक २६ जुलै २०२५ रोजी यशस्वीपणे संपन्न झाली. या कार्यशाळेचे उद्घाटन टीएमसी विधी विद्यालयच्या प्राचार्या डॉ. श्रीविद्या

जयकुमार यांच्या शुभहस्ते झाले. उद्‌घाटनप्रसंगी, सहायक प्राध्यापक श्री. मनोजकुमार नाईक यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून त्यांचे स्वागत केले आणि या विषयाचे महत्त्व, तसेच कार्यशाळेचा उद्देश याबद्दल सांगितले. सहाय्यक प्राध्यापिका प्रेरणा सावे यांनी सर्व पाहुण्यांचे आणि प्रमुख वक्त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

**सत्रे आणि मान्यवरांचे मार्गदर्शन**

१. ॲड. सुरेश पायक (उच्च न्यायालय, मुंबई)

पहिल्या सत्रात ॲड. पायक यांनी 'महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम' यावर मार्गदर्शन केले. त्यांनी भाडेकरू व मालक यांच्या हक्कांचे संरक्षण करणाऱ्या महत्त्वाच्या तरतुदी सांगितल्या व कायद्याचा व्यावहारिक उपयोग स्पष्ट केला.

२. ॲड. सुनील परांजपे (उच्च न्यायालय, मुंबई)

दुसऱ्या सत्रात ॲड. परांजपे यांनी 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता व बॉम्बे भाडेधारक व कृषी जमीन कायदा' याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी भाडेधारक प्रकरणांतील महत्त्वपूर्ण निर्णय व उपलब्ध कायदेशीर उपाय सांगितले व विद्यार्थ्यांना महसूल न्यायालयांमध्ये वकिली करण्यास प्रवृत्त केले.

३ ॲड. अनंत गद्रे (उच्च न्यायालय, मुंबई)

तिसऱ्या सत्रात ॲड. गद्रे यांनी शहर नियोजन व भू-संपादन कायद्यांविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी सार्वजनिक कारणासाठी भू-संपादन प्रक्रियेचे टप्पे, कायदेशीर तरतुदी, तसेच जमीन मालकांनी कराव्या व न कराव्या गोष्टींबाबत सल्ला दिला.

कार्यशाळेचा समारोप व आभारप्रदर्शन सहायक प्राध्यापक सौ. हेतल मेशेरी यांनी केले. त्यांनी सर्व मान्यवर वक्ते, सहभागी विद्यार्थी व आयोजन समितीचे मनःपूर्वक आभार मानले. ही कार्यशाळा विधी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली. विद्यार्थ्यांना अनुभवी कायदेतज्ज्ञांकडून प्रत्यक्ष कायद्याच्या क्षेत्रातील अनुभव व सल्ला मिळाल्यामुळे त्यांच्या व्यावसायिक अभ्यासाला नवे परिमाण मिळाले.





**२४ जुलै २०२५ राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष कार्यशाळा :**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेबाबत कार्यशाळेचे आयोजन दिनांक २४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता शहीद स्मारक सभागृह घाटकोपर येथे करण्यात आले होते. महाविद्यालयातर्फे सहाय्यक प्राध्यापक प्रो. डॉ. रुपाली जामोदे आणि लिपिक रामेश्वर चव्हाण ह्यांनी ह्या कार्यशाळेत सहभाग घेतला.

**बार कौन्सिल ऑफ इंडिया भेट**

दिनांक २६ जुलै दुपारी ३.०० वाजता विधी अभ्यासक्रमाच्या अतिरिक्त तुकडी संबंधी आवश्यक बाबींची पूर्तता योग्य प्रकारे करण्यात आली आहे का ह्या बाबत तपासणी करण्यासाठी बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या तीन जणांच्या समितीने व्हर्च्युअल मोड (झूम) ह्या online माध्यमाद्वारे महाविद्यालयास भेट दिली. त्या समिती मध्ये माननीय न्यायमूर्ती श्री.एस.के. गुप्ता अध्यक्षस्थानी, प्रा. श्री. ग्रीजेश शुक्ला सदस्य शैक्षणिक आणि श्री. साई गिरीधर अधिवक्ता ह्यांचा समावेश होता. महाविद्यालयाचे प्रांगण ह्या पासून सुरुवात करून ग्रंथालय, मुटकोर्ट, वर्ग, जिमखाना, इत्यादी ठिकाणी त्यांनी पडताळणी केली.

◆ **तृतीय वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांची मूट कोर्ट परीक्षा ३० जुलै आणि ३१ जुलै २०२५ पासून सुरू झाली.**



## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

महाविद्यालयाच्या ‘Research Club’चे उद्‌घाटन दिनांक २९/०७/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण करण्यासाठी Research Club चा मोलाचा वाटा ठरणार आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात Journals, Magazines open sources ची उपलब्धता आहे. VPMCOE च्या Research Club अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या Automation & Robotics, Electronics & Telecommunication, Information Technology, Computer Engineering व Electrical Engineering च्या तृतीय सत्रातील अनेक विद्यार्थ्यांनी Research Club मध्ये सहभाग घेतला आहे. Research Club मध्ये Journals, Magazines चे वाचन, विविध स्पर्धेचे आयोजन केले आहेत. अनेक विद्यार्थ्यांच्या Ideas, Research Oriented Projects प्रत्यक्षात आणण्यासाठी Research Club प्रयत्नशील राहील.

Research Club मध्ये पुढील नमूद केलेले प्राध्यापक सहभागी होतील –

१) डॉ. सौ. गीताली शेखर इंगवले (Research Club I/C)

२) डॉ. अमर जाधव (Humanities & Applied Science)

३) सौ. उज्ज्वला रामटेके (Electronis & Telecommunication Faculty Co-ordinator)

४) सौ. योगिनी बागडे (Electrical Engineering Faculty Co-ordinator)

५) सौ. अर्चना कालिया (Information Technology Faculty Co-ordinator)

६) सौ. रुपाली खरात (Computer Engineering Faculty Co-ordinator)

७) सौ. रेश्मा बनगर (Automation & Robotics Faculty Co-ordinator)

महाविद्यालयाच्या ‘Research Club’ च्या अंतर्गत ‘लोगो (Logo)’ कलात्मकरित्या तयार करण्याची स्पर्धा आयोजित केली. सदर स्पर्धेत कॉम्प्युटर इंजिनीअरिंग इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रीकल इंजिनीअरिंग, ऑटोमेशन व रोबॉटिक्स आणि इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन च्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या स्पर्धेत ५० लोगो (Logos) सादरीकरण झाले. स्पर्धेचा निकाल ११ ऑगस्ट २०२५ रोजी लागला. सदर स्पर्धेचे परिक्षक म्हणून अभियांत्रिकी महाविद्यालयातील फातिमा रिझवी व डॉ. अमर जाधव यांनी काम केले. स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे –

१) कु. भाग्यश्री वराडे (प्रथम पारितोषिक)
तृतीय सत्र ऑटोमेशन व रोबॉटिक्स

२) कु. आश्लेषा चौधरी (द्वितीय पारितोषिक)
तृतीय सत्र ऑटोमेशन व रोबॉटिक्स

३) कु. तन्विश केणी (तृतीय पारितोषिक)
तृतीय सत्र इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन

उत्तेजनार्थ पारितोषिक :-

१) कु. भूमी पवार (तृतीय सत्र कॉम्प्युटर इंजिनीअरिंग)

२) कु. गौरी चौधरी (तृतीय सत्र इलेक्ट्रीकल इंजिनीअरिंग)

३) कु. त्रिशा शेट्टी (तृतीय सत्र इन्फोरमेशन आणि टेलिकम्युनिकेशन)

४) कु. श्रेयस हिंदूराव (तृतीय सत्र इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन)

५) कु. निखिल झा (तृतीय सत्र इलेक्ट्रीकल इंजिनीअरिंग)

सदर स्पर्धेसाठी व सेक्रेटरींनी काम पाहिले. स्पर्धेसाठी प्रत्येक शाखेतील समन्वयांनी काम पाहिले.

**Workshop on "Design Thinking, Critical Thinking & Innovation Design" :**




**कार्यक्रमाचा उद्देश:**

या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांना वास्तविक जगातील समस्या सर्जनशील आणि प्रभावीपणे सोडवण्यासाठी संरचित विचारसरणीच्या चौकटीने सुसज्ज करणे हा होता. या सत्रात डिझाइन विचारसरणीची मुख्य तत्त्वे समजून घेणे, गंभीर विचारसरणीची साधने वापरणे आणि व्यवहार्य आणि प्रभावी अशा दोन्ही प्रकारच्या उपायांसाठी नावीन्यपूर्ण डिझाइन धोरणांचा शोध घेणे यावर लक्ष केंद्रित केले गेले.

लघु अहवाल: डिझाइन विचारसरणी, गंभीर विचारसरणी आणि नावीन्यपूर्ण डिझाइनवरील कार्यशाळा सर्व सहभागींसाठी एक अत्यंत आकर्षक आणि बौद्धिकदृष्ट्या उत्तेजक सत्रं ठरली.

श्री. माधव व्यास यांच्या नेतृत्वाखाली, सत्राची सुरुवात जटिल, वास्तविक जगातील आव्हानांना तोंड देण्यासाठी सर्जनशील आणि विश्लेषणात्मक विचारसरणी एकत्रित करण्याच्या महत्त्वाच्या परिचयाने झाली. सहभागींना डिझाइन विचारसरणी ही मानव-केंद्रित, पुनरावृत्ती प्रक्रिया म्हणून ओळख करून देण्यात आली.

ज्यामध्ये सहानुभूती, समस्या व्याख्या, कल्पना, प्रोटोटाइपिंग आणि चाचणी समाविष्ट आहे - हे सुनिश्चित करणे की उपाय केवळ नावीन्यपूर्णच नाहीत तर अंतिम वापरकर्त्यांसाठी अर्थपूर्ण देखील आहेत.

क्रिटिकल थिंकिंग विभागात, गृहीतकांवर प्रश्न विचारणे, माहितीचे वस्तुनिष्ठपणे मूल्यांकन करणे आणि तार्किक निर्णय घेणे यावर भर देण्यात आला. विद्यार्थ्यांनी समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि अंतर्निहित कारणे ओळखण्यासाठी ५ का पद्धत आणि मूळ कारण विश्लेषण यासारख्या व्यावहारिक साधनांचा शोध घेतला. या सत्रात दृष्टिकोन बदलण्यास प्रोत्साहन देण्यात आले - लपलेल्या संधी शोधण्यासाठी अनेक कोनांतून समस्येकडे पाहण्यास कार्यशाळेतील इनोव्हेशन डिझाइन भाग हा सर्जनशील पण व्यावहारिक उपाय तयार करण्यासाठी इष्टता, व्यवहार्यता यांचे संतुलन साधण्यावर केंद्रित होता. ROLE फ्रेमवर्कची ओळख सुव्यवस्थित उपाय विकसित करण्यासाठी एक संरचित दृष्टिकोन म्हणून करण्यात आली.

संवादात्मक क्रियाकलाप सत्राचा कणा बनले. विद्यार्थ्यांनी TATA Nano, Hike Messenger आणि Paytm Box सारख्या केस स्टडीजचे विश्लेषण करण्यासाठी आणि त्यांच्या बाजारातील निकालांमागील कारणे ओळखण्यासाठी संघांमध्ये काम केले. एक प्रमुख क्रियाकलाप म्हणजे कॉलेज प्लेसमेंट पोर्टलची पुनर्कल्पना करणे, जिथे सहभागींनी शिकलेल्या संकल्पना वापरकर्ता-अनुकूल, नावीन्यपूर्ण सुधारणा प्रस्तावित करण्यासाठी लागू केल्या.

कार्यशाळेचा समारोप एका खुल्या प्रश्नोत्तर सत्राने झाला, ज्यामुळे सहभागींना संकल्पना स्पष्ट करता आल्या आणि शैक्षणिक प्रकल्प, इंटर्नशिप, स्टार्ट-अप आणि भविष्यातील करिअरमध्ये या विचार पद्धती कशा लागू करता येतील यावर चर्चा करता आली.

एकंदरीत, या कार्यक्रमाने सहभागींची समस्यांना पद्धतशीरपणे हाताळण्याची, सर्जनशीलपणे विचार करण्याची आणि प्रभावी उपाय डिझाइन करण्याची क्षमता लक्षणीयरीत्या वाढवली, ज्यामुळे ते VPM च्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शिक्षण संस्कृतीत एक मौल्यवान भर पडली.



## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

डॉ. व्ही. एन. बेडेकर इन्स्टिटट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (डॉ. व्ही. एन. ब्रिम्स) ला भारत सरकारच्या विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) तर्फे स्वायत्त दर्जा प्रदान.

वि.प्र.म. चे अध्यक्ष डॉ. विजय वा. बेडेकर यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, भारत सरकारच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) संस्थेला स्वायत्त दर्जा प्रदान केला आहे. व्यवस्थापन शिक्षणात शैक्षणिक उत्कृष्टता आणि नवोपक्रमाच्या दिशेने डॉ. व्ही. एन. ब्रिम्सच्या प्रवासात हा महत्त्वाचा टप्पा आहे.

मुंबई विद्यापीठ आणि महाराष्ट्र सरकारच्या मान्यतेने देण्यात आलेला हा स्वायत्त दर्जा, डॉ. व्ही. एन. ब्रिम्सला स्वतःचा अभ्यासक्रम तयार करणे आणि अमलात आणण्यास, उद्योगाशी संबंधित अभ्यासक्रम सुरू करण्यास आणि नावीन्यपूर्ण अध्यापन-शिक्षण पद्धती स्वीकारण्यास सक्षम करतो. यामुळे संस्था मुंबई विद्यापीठाच्या तत्त्वानुसार परीक्षा घेण्यास, विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्यास आणि पदव्या प्रदान करण्यास सक्षम होते.

दशकांच्या शैक्षणिक उत्कृष्टतेसह, डॉ. व्ही. एन. ब्रिम्सने व्यवस्थापन शिक्षण, उद्योग सहकार्य, संशोधन उपक्रम आणि विद्यार्थी विकास कार्यक्रमांसाठी एक केंद्र म्हणून स्वतःचे स्थान निर्माण केले आहे आणि आता ही स्वायत्तता जागतिक स्तरावर स्पर्धात्मक, स्थानिक पातळीवर संबंधित व्यवस्थापन शिक्षण देण्याच्या ब्रिम्सच्या दृष्टिकोनाला आणखी बळकटी देईल.

या प्रवासात सतत सहकार्य केल्याबद्दल यूजीसी, मुंबई विद्यापीठ, महाराष्ट्र सरकार, उद्योग भागीदार, माजी विद्यार्थी, प्राध्यापक, विद्यार्थी आणि हितचिंतकांचे मनापासून आभार.

जीवनात प्रत्येक गोष्टीच्या आपापल्या ठरलेल्या वेळा असतात.

४ जुलै २०२५ : के. जे. सोमय्या विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातर्फे सहाय्यक प्रा. आदिती दामले-पवार यांना सलग दुसऱ्यांदा 'रिज्युम बिल्डिंग आणि इंटरव्ह्यू स्किल्स' या विषयावरील सत्र आयोजित करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले, यामध्ये ८० विद्यार्थ्यांनी भाग घेतला.







१६ जुलै २०२५ : सहाय्यक प्रा. अदिती दामले-पवार यांच्या अध्यक्षते खालील आंतरराष्ट्रीय कनेक्ट समितीने डॉ. व्ही. एन. ब्रिम्स आणि सेगी विद्यापीठ यांच्यात यशस्वीरीत्या सामंजस्य करार केला. सेगी विद्यापीठाने जगभरातील पहिल्या १.५% विद्यापीठांमध्ये स्थान मिळवले आहे. या धोरणात्मक भागीदारीचा उद्देश विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या देवाणघेवाण कार्यक्रमांना, तसेच सहयोगी संशोधन उपक्रमांना प्रोत्साहन देणे असून, जागतिक शैक्षणिक सहभागाच्या दिशेने ब्रिम्स प्रवासातील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.




१७ जुलै २०२५ : सल्लासेवा प्रकल्पाचा भाग म्हणून डॉ. स्मिता जपे, डॉ. विभूती आणि डॉ. महेश ; तेलवणे इक्विपमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड येथील खरेदी ऑपरेशन्स प्रमुख श्री. प्रवीण डोंगरवार यांच्या सोबत बैठकीला उपस्थित राहिले.



२५ जुलै २०२५ : ब्रिम्स तर्फे विद्यार्थ्यांच्या विकसित गरजा पूर्ण करणाऱ्या नावीन्यपूर्ण अध्यापन पद्धती तयार करण्यासाठी, त्याबद्दलचे अनुभव कथन करण्यासाठी, तसेच प्राध्यापकांना त्यांच्या प्रयत्नासाठी प्रोत्साहन देणे या उद्देशाने 'इंटरकॉलेजिएट फॅकल्टी पेडागॉजी इनोव्हेशन चॅलेंज (एफपीआयसी) २०२५' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.


ब्रिम्सच्या इन्स्टिटच्यूट इनोव्हेशन कौन्सिल (आयआयसी) च्या उपाध्यक्ष डॉ. विभूती सावे यांच्या नेतृत्वाखालील ही स्पर्धा एचआर, मार्केटिंग, फायनान्स आणि जनरल मॅनेजमेंट या विषयांमधील अध्यापन-शास्त्रातील नावीन्यपूर्ण कल्पनांची देवाणघेवाण करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आली. चार प्रसिद्ध वृत्तपत्रांनी या स्पर्धेचे वृत्तांकन प्रकाशित केले.




डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी तयार केलेल्या परिणाम-आधारित विद्यार्थी-केंद्रित नावीन्यपूर्ण अध्यापन पद्धतीने या इंटरकॉलेजिएट फॅकल्टी पेडागॉजी इनोव्हेशन चॅलेंज २०२५ (एफपीआयसी २०२५) मध्ये प्रथम पारितोषिक जिंकले, तर सहाय्यक प्रा. कीर्ती दिवेकर यांनी तिसरे पारितोषिक जिंकले.




२८ जुलै २०२५ : ब्रिम्सच्या विद्यार्थी विकास समिती (एसडीसी) तर्फे व्यवस्थापनाशी संबंधित संकल्पनांवर आधारित 'क्विझकॉन' ही एक मजेदार प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केली. ही स्पर्धा मॅनेजमेंट क्रॉसवर्ड, ब्रँड जंबल, चालू घडामोडी, बिझनेस लीडर्सचा अंदाज घ्या, ४ प्रतिमा १ शब्द अशा ५ मनोरंजक विभागांमध्ये विभागली गेली होती.







२८ जुलै २०२५ : ब्रिम्स तर्फे डॉ. स्मिता जपे, श्री. प्रशांत, डॉ. विभूती आणि डॉ. महेश यांनी तेलवेन इक्विपमेंट्स प्रायव्हेट लिमिटेडसाठी इन्व्हेंटरी मॅनेजमेंट आणि कॉस्ट कंट्रोलवरील २ कन्सल्टन्सी प्रोजेक्ट यशस्वीरीत्या पूर्ण केले. कंपनीच्या उच्च व्यवस्थापनाने टीमला दिलेल्या सूचना आणि उपायांबद्दल त्यांचे कौतुक केले.



३० जुलै २०२५ : डॉ. स्मिता जपे यांना जर्नल ऑफ बेसिक अँड अप्लाइड रिसर्च इंटरनॅशनल तर्फे त्यांच्या संशोधन नियतकालिकासाठी समीक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले.




...

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❇ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❇ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❇ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| **सभागृहाचे नाव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❇ संपर्क ❇**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.